गुरुवार, १ डिसेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १३४
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

आफताब श्रद्धाला हत्येसाठी घेऊन आला होता दिल्लीत/२
खोपोली पटेलनगर रहिवाशांचे अनोखे कचरा आंदोलन/५
विजय हजारे चषक स्पर्धेत महाराष्ट्र संघ अंतिम फेरीत/८

## पंतप्रधान ११ डिसेंबरला नागपुरात; दोन प्रकल्पांचे लोकार्पण



**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ डिसेंबर रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून त्यांच्या हस्ते बहुप्रतिक्षित समृद्धी महामार्गाच्या नागपूर-शिर्डी पहिल्या टप्प्याचे उद्घाटन होणार आहे. त्याचप्रमाणे नागपूर मेट्रोच्या रिच-२ (कामठी मार्ग) व रिच-४ (सेंट्रल एव्हेन्यू) या मार्गांचेदेखील त्यांच्या हस्ते उद्घाटन होईल. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित असतील. महा मेट्रोच्या सूत्रांनी सांगितले की, पंतप्रधान नागपूरला येण्यापूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळ हे नागपूर आणि पुणे मेट्रो ते नाशिक मेट्रो निओच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देण्याची शक्यता आहे, तर उद्घाटनाअगोदर नागपूर-शिर्डी समृद्धी महामार्ग पूर्णतः तयार होईल, असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (व्हीसीएमडी) राधेश्याम मोपलवार यांनी म्हटले आहे.

# दुर्ग प्राधिकरणाची स्थापना करणार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची घोषणा; शिवप्रताप दिन उत्साहात

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील प्रतापगडावर ३६३वा शिवप्रताप दिन बुधवारी (दि. ३०) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गड-किल्ल्यांच्या संवर्धनाची गरज असून त्यासाठी नव्या दुर्ग प्राधिकरणाची स्थापना केली जाईल, अशी घोषणा केली. त्याचप्रमाणे त्यांनी प्रतापगडाच्या संवर्धनासाठी २५ कोटी रुपयांची निधी देण्याचे जाहीर केले.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात परिवर्तन झाले नसते तर आज उत्साह दिला नसता. शिवरायांच्या पुण्याईने सगळ्या गोष्टी घडल्या. एक आदर्श राजा म्हणून शिवरायांकडे जग पाहते. प्रतापगडावरील अतिक्रमण निघाले पाहिजे ही मागणी होत होती. नियमाने व कायद्याने काम करण्याचे धाडस दाखवले जात नव्हते, पण ते अतिक्रमण काढून टाकायचा निर्णय झाला आणि कारवाई करण्यात आली. शिवरायांचे साक्ष देणारे प्रसंग पुढे नेल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

आमचे सरकार आल्यामुळे राज्यात सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहेत. परिवर्तन घडले नसते तर आज एवढा उत्साह नसता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने हे सत्तापरिवर्तन झाले आहे. आता ज्यांच्याकडे काही काम नाही ते आरोप करीत असतात. आम्ही आरोप करणाऱ्यांना कामातून उत्तर देणार आहोत, अशी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी विरोधकांवर केली.

या राज्यातील जनतेच्या जे मनात होते तेच आम्ही केले. अयोध्येत राम मंदिर बांधण्याचे स्वप्न बाळासाहेब ठाकरे यांचे होते. कलम ३७० हटवण्याची मागणी बाळासाहेब ठाकरेंची होती. ते काम भाजपने करून दाखवले. याच भाजपशी आम्ही युती केली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या सोहळ्यास पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा, उत्पादन शुल्कमंत्री तथा पालकमंत्री शंभुराज देसाई, आमदार शिवेंद्रराजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

## नवाब मलिकांना दिलासा नाहीच!

### मुंबई सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला

**मुंबई : प्रतिनिधी**



अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या हस्तकांशी संबंध व आर्थिक व्यवहारप्रकरणी अटकेत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांचा जामीन अर्ज मुंबई सत्र न्यायालयाने बुधवारी (दि. ३०) फेटाळला. महाविकास आघाडीसाठी हा धक्का आहे.

वैद्यकीय कारणासाठी नवाब मलिक यांनी जामिनासाठी अर्ज केला होता, पण मुंबई सत्र न्यायालयाने त्यांना जामीन देण्यास नकार दिला. कोर्टाने म्हटले की, प्राथमिकदृष्ट्या या प्रकरणी तपास यंत्रणांनी जे पुरावे गोळा केले होते त्यानुसार मलिक यांच्यावरील आर्थिक घोटाळ्याच्या आरोपांमध्ये तथ्य असल्याचे दिसते. त्यामुळे अशा परिस्थितीत त्यांना जामीन देता येणार नाही. न्या. राहुल रोकडे यांच्यासमोर या प्रकरणी काही महिने सुनावणी झाली. त्यानंतर कोर्टाने बुधवारी यावर निकाल दिला.

नवाब मलिकांवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. त्यामुळे पुढील निर्देश येईपर्यंत त्यांच्यावरील उपचार चालूच राहणार आहेत. परिणामी त्यांची रवानगी लगेच तुरुंगात होणार नसून ते रुग्णालयातच उपचार घेणार आहेत. दरम्यान, सत्र न्यायालयाच्या आदेशाविरोधात तातडीने उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचे मलिकांच्या वकिलांनी म्हटले आहे.

दाऊदच्या हस्तकाशी संबंधित असलेल्या सुमारे ३०० कोटींच्या मालमत्तेचा व्यवहार करणाऱ्या कंपनीशी नवाब मलिक यांचा संबंध असल्याचे सक्तवसुली संचालनालयाला अर्थात ईडीला आढळले होते. त्यानंतर ईडीने मलिक यांना २३ फेब्रुवारी २०२२ रोजी अटक केली होती.

## कंत्राटी परिचारिकांना शासनाचा दिलासा

### कोरोना काळात काम करणाऱ्या ५९७ जणी कायम



**मुंबई : प्रतिनिधी**

डॉक्टर आणि परिचारिका यांनी कोरोना महामारीत जीवाची बाजी लावत काम करीत कर्तव्य निभावले होते. या काळात कंत्राटी पद्धतीने कामावर घेतलेल्या ५९७ परिचारिकांना राज्य सरकारने दिलासा देत कायमस्वरूपी आरोग्य विभागात समावेश करून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरोना महामारीच्या काळात कंत्राटी परिचारिकांसोबत ११ महिन्यांचा करार करण्यात आला होता, मात्र तो संपुष्टित आल्यानंतर या सर्व परिचारिकांना घरी जावे लागणार होते, पण राज्य सरकारने केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करून या सर्व परिचारिकांना कायमस्वरूपी शासनात घेण्याचा निर्णय घेतला आहे. आरोग्य सेवा व संचालक आयुक्त पदावरून बदली होण्यापूर्वी तुकाराम मुंढे यांनी या संबंधीचा निर्णय जारी केला. त्यानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे यांनी त्यांच्या मंडळातील एनयुएचएम, आरबीएसके, आदिवासी, बिगर आदिवासी, नक्षलग्रस्त व अर्बन आरसीएच कार्यक्रमांतर्गत रिक्त पदावर नेमणुका द्याव्यात, असे म्हटले आहे.

### गुजरातमध्ये आज पहिल्या टप्प्यातील मतदान; तयारी पूर्ण

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**


गुजरात विधानसभेच्या सर्व १८२ जागांपैकी ८९ जागांवर गुरुवारी (दि. १) पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी राजकीय पक्षांबरोबरच प्रशासन आणि पोलीस यंत्रणेने तयारी केली आहे.

यानंतर ५ डिसेंबरला दुसऱ्या टप्प्यात ९३ जागांवर मतदान होईल. मग ८ डिसेंबर रोजी एकत्रित मतमोजणी होणार आहे. गेल्या २७ वर्षांपासून राज्यात भाजपची सत्ता असून ती कायम ठेवण्यासाठी पक्षाने जोरदार प्रचार करीत आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**

ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. नागनाथ लालूजीराव कोत्तापल्ल यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.



साठोत्तरी कालखंडात कविता, कथा, दीर्घकथा, कादंबरी, ललित गद्य आणि समीक्षा अशा विविध वाङ्मय प्रकारांत दर्जेदार साहित्यनिर्मिती करणारे नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी मुखेड (जि. नांदेड) या गावी झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण देगलूर येथे झाले. बीए आणि एमए या दोन्ही परीक्षांत मराठवाडा विद्यापीठात ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. कुलपतींच्या सुवर्णपदकाने ते सन्मानित झाले होते. शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर शोधप्रबंध लिहून त्यांनी १९८० साली पीएचडी पदवी संपादन केली. बीड येथील महाविद्यालयात मराठीचे अधिव्याख्याता आणि नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ते कुलगुरू झाले. व्यासंगी, अध्यापनकुशल, उपक्रमशील आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला. पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांनी बुधवारी अखेरचा श्वास घेतला.

### विविध ठिकाणी वावर

*श्रीगोंदा येथे १९९९ साली झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आणि २००५ साली जालना येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. चिपळूण येथे २०१२मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. राज्य शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे ते अध्यक्ष होते. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बालपुरस्कार समिती आणि एसएससी बोर्डाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कामही पाहिले.*

### निवडक

**आजपासून ई-रूपी किरकोळ बाजारात**

**नवी दिल्ली :** देशात गुरुवार (दि. १)पासून किरकोळ बाजारात डिजिटल चलन ई-रूपी



वापरात येणार आहे. आरबीआयने याबाबत घोषणा केली असून पहिल्या टप्प्यात मुंबई, नवी दिल्ली, बंगळुरू आणि भुवनेश्वर या शहरांत ई-रूपीचा वापर करता येईल. सरकारी क्षेत्रातील स्टेट बँक आणि खासगी क्षेत्रातील आयसीआयसीआय बँक, येस बँक व आयडीएफसी बँकेमार्फत व्यवहार होणार आहे. यापूर्वी केंद्रीय बँकेने १ नोव्हेंबरला होलसेल ट्रँझॅक्शनसाठी डिजिटल चलन लाँच केले होते.

## माटवणमधील हत्येप्रकरणी नऊ जणांना जन्मठेप



**न्यायालयाचा निकाल**

**पोलादपूर, अलिबाग : प्रतिनिधी**

राजकीय वैमनस्यातून पोलादपूर तालुक्यातील माटवण येथील गणपत विश्राम मांढरे यांच्या हत्येप्रकरणी माणगाव अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश टी. एन. जहांगीरदार यांनी नऊ जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे.

विठ्ठल कृष्णा म्हस्के, सखाराम विश्राम मांढरे, विकास विठ्ठल म्हस्के, संकेत नारायण म्हस्के, विलास पांडुरंग गोगावले, नाना नथू मांढरे, नाना धोंडू म्हस्के, राजू श्रीपत कालगुडे, कैलास धोंडू नवघरे अशी जन्मठेप झालेल्या आरोपींची नावे आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे काम करणाऱ्या या नऊ जणांनी शिवसेनेचे गणपत विश्राम मांढरे यांची ३१ मे २०२० रोजी हत्या केली होती.

घटनेच्या दिवशी गणपत मांढरे हे त्यांच्या मोटरसायकलवरून (एमएच ०६-बीबी ५३४४) माटवण येथून कामावर जात असताना विलास गोगावले यांच्या गुरांच्या गोठ्याजवळ आले असता आरोपींनी त्यांना अडवून लाकडी दांडक्यांनी मारहाण केली. त्यात गणपत मांढरे यांचा मृत्यू झाला. **(पान २ वर..)**

## शासन कलावंतांच्या पाठीशी -ना. मुनगंटीवार

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय संगीत नाटक अकादमी ही देशातील एक प्रतिष्ठित संस्था आहे. संगीत तसेच नाटक क्षेत्रासाठी अकादमीकडून देण्यात येणाऱ्या गेल्या तीन वर्षांतील पुरस्कारांची अलीकडेच घोषणा झाली असून महाराष्ट्रातील तब्बल १७ कलावंतांना हे मानाचे पुरस्कार घोषित झाले आहेत. ही अतिशय गौरवास्पद बाब असल्याचेही सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले तसेच पुरस्कार विजेत्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

राष्ट्रीय संगीत नाटक अकादमीच्या अध्या डॉ. संध्या पुरेचा यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेतली. त्या वेळी ते बोलत होते. बांबू निर्मित तिरंगा भेट देऊन डॉ. पुरेचा यांचा सांस्कृतिक कार्यमंत्री मुनगंटीवार यांनी सत्कार केला.



महाराष्ट्राला संगीत नाटकांची समृद्ध परंपरा लाभलेली असून भविष्यातही संगीत नाटकांच्या वाटचालीसाठी शासन संगीत नाटक कलावंतांच्या पाठीशी राहील, असा विश्वास मंत्री मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. या वेळी अकादमीचे कार्यकारी सदस्य डॉ. विद्याधर व्यास, डॉ. उमा डोगरा, डॉ. प्रकाश खांडगे उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना मिळणार आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्कूल सेफ्टी कार्यक्रमांतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३४ शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नागरी संरक्षण दल व होमगार्ड यांच्यामार्फत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

राज्याच्या शिक्षण विभाग, युएनडीपी व महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्या पुढाकाराने आणि रिका इंडिया या संस्थेच्या सहकार्याने १४ डिसेंबरपर्यंत आपत्ती व्यवस्थापन मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले आहे. नागरी संरक्षण दल व होमगार्ड विभागातील अधिकारी संबंधित शाळा अथवा महाविद्यालयातील शिक्षकांशी समन्वय साधून ते होईल. यामध्ये विद्यार्थ्यांना आपत्ती अथवा धोक्याची सूचना, आग विमोचन, स्थलांतर याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांना नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीमध्ये धैर्याने संकटावर मात कशी करावी तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे बहुमोल व उपयोगी प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## कपिल देव झाले कर्जतकर!



### कोठिंबे येथे जमिनीची खरेदी

**कर्जत : प्रतिनिधी**

भारताचे माजी क्रिकेटपटू कपिल देव यांनी कर्जत तालुक्यातील कोठिंबे येथे जमीन खरेदी केली आहे. त्यामुळे ते कर्जतकर झाले आहेत.

कर्जत आणि फार्महाऊस हे समीकरण बनले आहे. येथील प्रदूषणमुक्त वातावरणासोबत निसर्ग, बारमाही वाहणाऱ्या नद्या यामुळे विविध क्षेत्रांतील लोक कर्जतमध्ये सेकंड होम बांधून विकेण्डला येत असतात. त्यात राजकीय नेत्यांच्या असलेल्या टुमदार बंगल्यांमुळे कर्जत अधिक ठळकपणे प्रसिद्धीच्या झोतात आले आहे.

आपल्या देशाला क्रिकेटमधील पहिला विश्वचषक जिंकून देणारे कपिल देव हेही कर्जतच्या प्रेमात पडले. त्यांनी तालुक्यातील कोठिंबे भागात जमीन खरेदी केली आहे. त्या जमिनीचे दस्त कपिल यांच्याकडून नेरळ येथील सह निबंधक कार्यालयात नोंदविण्यात आले. याची कार्यवाही करणारे कर्जत बार असोसिएशनचे वकील भूपेश पेमारे आणि सहनिबंधक महेंद्र भगत यांनी याबाबत गुप्तता पाळली होती. तरीही कपिल आल्यानंतर चाहत्यांची गर्दी झाली.

कपिल यांनी कोठिंबे येथे २५ एकर जमीन खरेदी केली असल्याची माहिती मिळत असून त्यासाठी काही लाखांत स्टॅम्प ड्युटी भरली असल्याची माहिती समोर येत आहे. अन्य सेलिब्रिटीप्रमाणे कपिलही आता कर्जत तालुक्याचे रहिवासी बनणार आहेत.



# मेट्रोच्या भुर्दंडाचे पैसे ठाकरेंकडून वसूल करा

## भाजप प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे आणि त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांच्या बालिश हट्टामुळेच मेट्रो कारशेडचे काम रखडले आणि मुंबईकरांवर दहा हजार कोटींचा वाढीव बोजा पडल्याचे स्पष्ट झाले आहे. हा मुंबईद्रोह असून राज्याबद्दल उद्योगक्षेत्रात संशयाचे वातावरण तयार करून आता महाराष्ट्रद्रोह केला जात आहे, असा थेट आरोप भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी बुधवारी (दि. ३०) केला. मेट्रोचे काम रखडवल्याबद्दल उद्धव व आदित्य या ठाकरे पिता-पुत्रांकडून दहा हजार कोटी वसूल करा, अशी मागणीही उपाध्ये यांनी या वेळी केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश प्रवक्ते अतुल शाह सोबत उपस्थित होते.



मेट्रो प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा कोणताही अभ्यास नसताना आणि कारशेड आरेमध्येच उभारणे योग्य असल्याचा अहवाल जाणीवपूर्वक दाबून ठेवून कारशेडच्या कामास स्थगिती देताना मुंबईकरांना सुविधांपासून वंचित ठेवण्याचाच ठाकरे पिता-पुत्रांचा कट होता का, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली. मेट्रो कारशेड आरेमध्येच उभारावी, असा स्पष्ट अहवाल मनोज सौनिक समितीने २०२०मध्येच ठाकरे सरकारला दिला होता. आता सर्वोच्च न्यायालयानेही आरेमध्ये मेट्रो कारशेड उभारण्यास हिरवा कंदिल दाखविल्याने ठाकरे यांच्या हट्टाचे पितळ उघडे पडले आहे.

वेदान्ता-फॉक्सकॉन प्रकल्पाविषयीची वस्तुस्थिती याआधीच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली आहे. घरातून सत्ता राबविण्याच्या उद्धव ठाकरेंच्या हट्टामुळेच महाराष्ट्रातून अनेक प्रकल्पांनी काढता पाय घेतल्याचे वारंवार स्पष्ट होऊनही ही जबाबदारी ढकलून महाराष्ट्राची दिशाभूल करण्याचा आदित्य ठाकरेंचा प्रयत्न केविलवाणा आहे, असा टोला उपाध्ये यांनी लगावला. आदित्य ठाकरे यांनी दाखवलेली कागदपत्रे फॉक्सकॉन महाराष्ट्रातून जाऊ नये यासाठी शिंदे-फडणवीस सरकारने केलेल्या प्रयत्नांची साक्ष देणारी आहेत. हा प्रकल्प महाराष्ट्रात व्हावा यासाठी उद्धव ठाकरे सरकारने केलेल्या प्रयत्नांचा पुरावा म्हणून आदित्य ठाकरे यांनी एक कागद तरी दाखवावा, असे आव्हानही उपाध्ये यांनी दिले.

राज्यात गुंतवणुकीसाठी योग्य वातावरण नाही असा गैरसमज उद्योगविश्वात पसरविण्याचा ठाकरे पितापुत्रांचा कट असून त्यासाठीच पुन्हापुन्हा बिनबुडाच्या कंड्या पिकविल्या जात आहेत. राज्यात सिनार्मस सारखे नवे प्रकल्प येत आहेत. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. ७५ हजार पदे भरण्याची मोहीम शिंदे-फडणवीस सरकारने हाती घेतली आहे, असेही उपाध्ये यांनी नमूद केले.

## आफताब श्रद्धाला हत्येसाठी घेऊन आला होता दिल्लीत

### पॉलिग्राफ चाचणीत दिला जबाब

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीत प्रेयसी श्रद्धा वालकरची हत्या करून मृतदेहाचे तुकडे करणाऱ्या आरोपी आफताब पुनावाला याची पॉलिग्राफ चाचणी करण्यात आली आहे. या चाचणीदरम्यान आफताबने आपण आधीपासूनच श्रद्धाच्या हत्येचा कट रचल्याचे आणि त्यासाठीच तिला घेऊन दिल्लीला गेल्याचे त्याने कबूल केले आहे.

आफताबला पॉलिग्राफ चाचणीत सात प्रश्न विचारण्यात आले. यातील तू श्रद्धाची हत्या केलीस का? १८ मे रोजी हत्या केलीस का? श्रद्धाच्या शरीराचे तुकडे जंगलात फेकले का? तिच्या हत्येचा कट आधीपासूनच रचला होता का? हत्येसाठीच श्रद्धाला दिल्लीत आणले होते का? या प्रश्नांना आफताबने हो उत्तर दिले, तर श्रद्धाची हत्या केल्याचा काही पश्चाताप आहे का? आणि तू हत्या केल्याचे तुझ्या कुटुंबाला माहिती होते का यावर त्याने नाही असे उत्तर दिले. आफताबकडून महत्त्वाची माहिती पोलिसांना मिळाली असून यामुळे तपासाची दिशा बदलण्याची शक्यता आहे.

वसईतील २६ वर्षीय तरुणी श्रद्धाची तिचाच प्रियकर आफताबने दिल्लीत खून करुन मृतदेहाचे ३५ तुकडे केले व ते जंगल भागात फेकून दिले.


## खोपोलीतील दिघे वाचनालयाला आग

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील पंतपाटणकर चौकामधील र. वा. दिघे वाचनाला बुधवारी (दि. २९) मध्यरात्रीच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत जीर्ण रद्दी, संगणक आणि विद्युत उपकरणे जळून खाक झाली, मात्र पुस्तके वाचविण्यात यश आले आहे. ही आग शॉर्टसर्किटमुळे झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

खोपोली नगर परिषदेच्या र. वा. दिघे सार्वजनिक वाचनालयाची मोठी आणि भव्य इमारत शहरातील पंतपाटणकर चौक शास्त्री नगर येथे आहे. वाचनालयात दैनंदिन वर्तमानपत्रे आणि हजारोच्या संख्येने पुस्तकांचा ठेवा आहे. बुधवारी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास वाचनालयातील कोपऱ्यात अचनाक आगीची ठिणगी उडली आणि खालीच असलेल्या जीर्ण रद्दीने पेट घेतला.

### विद्युत उपकरणे जळून खाक, पुस्तके बचावली



खोपोली नगर परिषदेचा अग्निशमन दल, पोलीस यंत्रणा तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य घटनास्थळी पोहचले. त्यांनी वाचनालयात प्रवेश करून दारे, खिडक्या उघडल्या. त्यानंतर पाण्याचा मारा केल्यामुळे आग आटोक्यात आली. या आगीत जीर्ण रद्दी, संगणक आणि विद्युत उपकरणे जळून खाक झाली. पुस्तकांसाठी खुप अंतर ठेवत मांडण्या केल्या असल्यामुळे ९० टक्के पुस्तके वाचविण्यात यश आले.

दिघे वाचनालयाला लागलेली आग विझविण्यासाठी खोपोली अग्निशमन दलाचे अधिकारी हरी सूर्यवंशी व संपूर्ण टीम, पोलीस उपनिरीक्षक अलोक खिस्मतराव, पोलीस कर्मचारी, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे गुरुनाथ साठेलकर, गौरव शिंदे, मनोज माने, ऋतूराज भोपतराव यांनी मोलाची मदत केली. वेळेवर मदत पोचल्याने मोठी ग्रंथसंपदा आगीपासून बचावली.

## ‘महाबीज’ खरेदी करणार २० टक्के जादा दराने शेतकऱ्यांचा भात

**उरण : वार्ताहर**

महाबीज कंपनी शेतकऱ्यांना सरकारी हमी भावापेक्षा २०% जादा दर म्हणजे प्रतिक्विंटला अंदाजे २४७३भाव देऊन भाताची खरेदी करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ही सुवर्णसंधी आहे.



उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकऱ्यांना महाबीज बियाणे उत्पादक संस्थेकडून, ग्रामबिजोत्पादन योजनेंतर्गत जया या भातपीक वाणाचे पायाभूत बियाणे उपलब्ध करून देण्यात आले होते. दरम्यान, या महाबीज भात पिकांची पाहणी १८ ऑक्टोबर रोजी महाबीजचे विभागीय बीज प्रमाणीकरण बीज परीक्षक अधिकारी श्री. डीसोझा आणि श्री तांदळे तसेच महाबीजचे अधिकारी सचिन पाटील त्याचबरोबर उरण तालुका कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी विश्वनाथ ढवळ, कृषी सहाय्यक निखिल देशमुख, सुरज घरत व कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील या सर्वांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली होती. या पाहणी दौऱ्यात महाबीज बियाण्यांच्या वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले होते.

दरम्यान, भातपिकांची कापणी व मळणी करून शेतकऱ्यांनी धान्य घरी आणल्यानंतर चिरनेर येथील श्री महागणपती सेंद्रिय शेतकरी गटामार्फत मंगळवारी (दि. २९) महाबीज कंपनीच्या कृषी क्षेत्र अधिकारी प्राची मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात बीजोत्पादनाचा कार्यक्रम राबविण्यात आला. या वेळी मोराळे यांनी महाबिजच्या पायाभूत बियाण्या विषयी आपला अनुभव कथन केला. यात महाबीज कंपनी शेतकऱ्यांना सरकारी हमी भावापेक्षा २०% जादा दर म्हणजे प्रतिक्विंटला अंदाजे २४७३ भाव देऊन भाताची खरेदी करणार असल्याचे सांगून, शेतकऱ्यांनी ४१ किलोच्या वजनाप्रमाणे भाताच्या गोणी भरून ठेवाव्यात. दोन दिवसांत भात उचलल्यानंतर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ताबडतोब पैसे जमा करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला प्रफुल्ल खारपाटील, कृष्णा म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे, संजय पाटील, भास्कर ठाकूर, दामोदर मुंबईकर, हिराजी ठाकूर, हसूराम मोकल, दत्तात्रेय पाटील, रवींद्र ठाकूर, संताजी ठाकूर, सुनील ठाकूर, जनार्दन कोळी, समाधान पाटील तसेच अन्य शेतकरी उपस्थित होते.

## दिल्लीत श्रद्धाप्रमाणे हत्या करून मृतदेहाचे तुकडे फेकले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीमध्ये अगदी श्रद्धा वालकर हत्याकांडाशी साम्य असणारी आणखी घटना घडली आहे. महिलेने आपल्या सावत्र मुलाच्या मदतीने पतीचा खून केल्यानंतर मृतदेहाचे तुकडे करून फ्रीजमध्ये ठेवले होते. यानंतर त्यांनी मृतदेहाच्या तुकड्यांची विल्हेवाट लावली. तब्बल पाच महिन्यांच्या तपासानंतर पोलिसांनी खूनाचा उलगडा केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रामलीला मैदानात मिळणारे मृतदेहाचे तुकडे अंजन दास यांचे आहेत. ते बिहारचे रहिवासी होती. पत्नी पूनम आणि सावत्र मुलगा दीपक यांनी मिळून हा खून केला. अंजन याची दीपकची पत्नी आणि बहिणीवर वाईट नजर होती. त्यामुळे त्यांनी आधी अंजनला गुंगीचे औषध दिले. यानंतर त्याची गळा कापून हत्या केली. मग मृतदेहाचे १० तुकडे केले आणि फ्रीजमध्ये ठेवून दिले. श्रद्धा वालकर खूनातील आरोपी आफताबप्रमाणे त्यांनीही रोज रात्री घराबाहेर पडत मृतदेहाचे तुकडे फेकून दिले होते.

दिल्ली पोलिसांच्या क्राइम ब्रांचने हजारो सीसीटीव्ही तपासले होते. यावरून त्यांनी अंजन दासची ओळख पटवली. चौकशी केली असता तो पाच ते सहा महिन्यांपासून बेपत्ता असल्याचे समोर आले. याबाबत पोलीस ठाण्यात कोणतीही तक्रार दाखल नव्हती. पोलिसांनी अंजनची पत्नी आणि मुलाकडे चौकशी केली. त्यांनी पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, पण नंतर आपला गुन्हा कबूल केला.

## हिंमत असेल तर माझ्याविरोधात निवडणूक लढवावी

### खासदार प्रताप जाधव यांचे उद्धव ठाकरे यांना आव्हान

**बुलढाणा : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुलढाण्यामध्ये शेतकरी मेळाव्यासमोर आक्रमक भाषण करीत शिंदे गटावर हल्लाबोल केला होता. त्यांना आता खासदार प्रताप जाधव यांनी जाहीर आव्हान दिले आहे.



उद्धव ठाकरेंनी आपल्या भाषणातून बुलढाण्यातील शिंदे गटाचे आमदार आणि खासदारांवर परखड शब्दांमध्ये टीका केली होती. इथले गद्दार खासदार आणि आमदारांमध्ये जर अजूनही मर्दानगी शिल्लक असेल, तर त्यांनी जाहीरपणे सांगावे की, आम्ही भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढणार नाही. यांना बाळासाहेबांचे नाव पाहिजे, त्यांचा चेहरा पाहिजे, शिवसेनेचे नाव पाहिजे आणि आशीर्वाद मोदींचा पाहिजे, असे ठाकरे म्हणाले होते.

उद्धव ठाकरेंनी खोके सरकार म्हणून केलेल्या टीकेला शिंदे गटाचे बुलढाण्यातील आमदार संजय गायकवाड यांनी प्रत्युत्तर दिले होते. खोके आणि बोके.. खोक्यांशिवाय गेल्या तीन-चार महिन्यांत त्यांना दुसरा कुठला विषय मांडता आला का? उद्धव ठाकरेंनी सीआयडी वगैरे जेवढ्या यंत्रणा असतील त्या लावून या खोक्यांचा एक तरी पुरावा आणून दाखवावा. जर त्यांनी असे केले, तर आयुष्यभर आम्ही त्यांचे पाय चेपत बसू. त्यांनी फक्त एकदा हे सिद्ध करून दाखवावे, असे आव्हान आमदार गायकवाड यांनी दिले होते.

आता बुलढाण्याचे खासदार प्रताप जाधव यांनीही उद्धव ठाकरेंना जाहीर आव्हान दिले आहे. त्यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी इथून माझ्याविरोधात लोकसभा निवडणूक लढवावी. मी शिवसेनेच्याच तिकिटावर लढणार. भाजपच्या तिकिटावर लढण्याचा विषय येतो कुठे? आम्ही शिवसेना पक्षातच आहोत. शिवसेनेचेच आहोत. बाळासाहेबांच्याच विचारांनी आम्ही चाललो आहोत, असे खासदार जाधव यांनी म्हटले आहे.

## काँग्रेस अध्यक्षांच्या विधानानंतर गुजरातमध्ये भाजप आक्रमक

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरात विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला केवळ दोन दिवस बाकी आहेत. त्यामुळे जोरदार प्रचार केला जात आहे. सर्व पक्ष प्रचारात गुंतलेले असताना काँग्रेसचे अध्यक्ष मलिल्कार्जुन खरगे यांनी केलेले विधान वादाचा विषय ठरत आहे. येथे एका सभेला संबोधित करताना खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रावणाशी तुलना केली आहे. याच कारणामुळे भाजपनेही काँग्रेसविरोधात आक्रमक पवित्रा धारण केला आहे.

मलिल्काकर्जुन खरगे सोमवारी अहमदाबादमधील बेहरामपुरा येथे एका सभेला संबोधित करीत होते. या वेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच भाजपवर सडकून टीका केली. या वेळी खरगे यांनी मोदी यांची रावणाशी तुलना केली आहे. भाजप सगळीकडे नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेचा वापर करते. स्थानिक स्वराज्य संस्था, लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकांमध्ये मोदींच्या प्रतिमेचा वापर केला जातो. आम्ही तुमचा चेहरा कितीवेळा पाहावा. मोदी १०० डोकी असलेले रावण आहेत का? असे खरगे म्हणाले.

दरम्यान, खरगे यांच्या या विधानानंतर भाजपने आक्रमक पवित्रा धारण केला आहे. काँग्रेसच्या अध्यक्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रावण म्हटलेले आहे. मुळचे गुजरातचे असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी वापरलेले हे शब्द योग्य नाहीयेत. हे विधान निषेधार्ह असून यातून काँग्रेसची मानसिकता दिसते. हा फक्त मोदी यांचाच नव्हे, तर प्रत्येक गुजराती नागरिकाचा अपमान आहे, असे भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी म्हटले आहे.

## पुण्यात पार्टीमध्ये तरुणीवर बलात्कार

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील वारजे माळवाडीमध्ये एका पार्टीदरम्यान २० वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अभियांत्रिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या सात ते आठ मित्र-मैत्रिणींनी एकत्र येऊन आयोजित केलेल्या पार्टीत बलात्काराची ही घटना घडली असून २४ वर्षीय आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कर्वेनगर येथे राहणाऱ्या एका मित्राच्या घरी शनिवारी सात ते आठ जणांनी पार्टीचे आयोजन केले होते. त्या वेळी २० वर्षीय पीडित तरुणीला मद्यपान केल्यानंतर तिला अस्वस्थ वाटू लागले. मोकळ्या हवेत उभे रहावे असा विचार करून ही तरुणी घराच्या गॅलरीमध्ये गेली. या तरुणीपाठोपाठ आरोपी स्वप्नील ठाणगे गॅलरीमध्ये गेला. त्यानेदेखील मद्यपान केले होते. नशेच्या धुंदीत असलेल्या स्वप्नील तरुणीवर बलात्कार केला. आरोपी स्वप्नीलविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणीमध्ये अधिक तपास सुरू आहे.

पान १ वरून

## माटवणमधील हत्येप्रकरणी नऊ जणांना जन्मठेप

याबाबत गणपत मांढरे यांचा मुलगा अतुल मांढरे याने पोलादपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सहाय्यक निरीक्षक प्रशांत जाधव व रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांनी तपास करून माणगाव अतिरिक्त सत्र न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. न्यायाधीश टी. एन. जहांगीरदार यांच्यासमोर खटल्याची सुनावणी झाली. जहांगीरदार यांनी नऊ आरोपींना दोषी ठरवून त्यांना जन्मठेप, प्रत्येकी ५० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरी अशी शिक्षा ठोठावली.

या खटल्यात शासकीय अभियोक्ता म्हणून ॲड. जितेंद्र म्हात्रे, तर मदतनीस म्हणून ॲड. मोहिनी शेठ यांनी काम पाहिले. सुनावणीदरम्यान पैरवी अधिकारी यु. एल. धुमास्कर, पोलीस हवालदार शशिकांत कासार, छाया कोपणार व शशिकांत गोविलकर यांनी सहकार्य केले.

## ३८ केंद्रांवर करता येणार भात खरेदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेंतर्गत दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांच्या मार्फत जिल्हा पणन अधिकारी, रायगड यांच्या अखत्यारीत असलेल्या धानखरेदीदार संस्थांमार्फत ३८ खरेदी केंद्रावर खरीप व रब्बी पणन हंगाम २०२२-२०२३ करिता धानाची (भाताची) खरेदी करण्यात येणार आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्याकडील १९ ऑक्टोबर २०२२ शासन निर्णयान्वये भात खरेदीचा धान-खरीप पणन हंगामाचा कालावधी १९ ऑक्टोबर २०२२ ते ३१ जानेवारी २०२३ असा असेल. तर रब्बी/उन्हाळी हंगाम केंद्र शासनाकडून प्राप्त सूचनांनुसार राहील.

भात खरेदीच्या वेळी शेतकऱ्यांनी आपल्याकडील जमिनीबाबतचा ७/१२ चा उताऱ्याची व गाव नमुना ८(अ) ची छायांकितप्रत खरेदी केंद्रावर धान विक्रीकरिता आणणे आवश्यक आहे. या उताऱ्यातील धान्य व धानाखालील क्षेत्र पाहून धान/भरडधान्य खरेदी करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या ७/१२ उतारानुसार पीकाखालील क्षेत्र,या वर्षीची पीक परिस्थिती (पैसेवारी), पीकाचे सरासरी उत्पादन या सर्व बाबी विचारात घेऊन, धान/भरडधान्य खरेदी करण्यात येईल.

धानाची खरेदी ही ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने संबधित शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक राहील. याकरिता खरेदी केंद्रावर भात विक्रीकरिता आणताना प्रत्येक शेतकऱ्यांनी सोबत आपल्या आधारकार्डाची तसेच बँकेच्या पासबुकाची छायांकित प्रत आणणे आवश्यक आहे तसेच रोज सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर खरेदी केंद्रांवर आणलेले, परंतु खरेदी न झालेले धान/भरडधान्य सांभाळण्याची जबाबदारी संबधित शेतकऱ्यांचीच राहील.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFx No. | Description of Work | Est. Cost |
| --- | --- | --- |
| Tend-39/22-23 **RFx No. 7000025280** | Work of SITC of IEC 61850 complied Digital communicable Distributed Architecture Based Transformer Auxiliary Monitoring System with Energy Data Acquisition System and Automatic Log Sheet Generation Module at 220kV Mahad Substation under EHV (O&M) Dn., Mahad. | Rs. 29.41 Lakh |

**EMD** 1% of Estimated Cost. **Tender Fee**: Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 30.11.2022 to 07.12.2022 up to 23:59 Hrs, **Opening Date:** 08.12.2022 @ 11:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm), Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006220. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

## निवडक

### पनवेलमधून दुचाकीची चोरी

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लीकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांची दुचाकी चोरीला गेली असून याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. स्वाभिमानी युथ रिपब्लीकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पांढऱ्या रंगाची ॲक्टिवा गाडी (एमएच ४६ ए ७३८) मार्केट यार्ड पनवेलजवळील भारत गॅस समोरील मोकळ्या मैदानात पार्क करून ठेवलेली होती. ही गाडी चोरीला गेलेली असून कोणाला दिसल्यास साळुंखे यांना (९९२०७४४११७) संपर्क करावा. माहीती देणाऱ्यास योग्य बक्षीस दिले जाईल तसेच पोलीस सीसीटीव्हीच्या आधारे चोरीचा तपास करीत आहे.

### पूल दुरूस्त करण्याची मागणी

**रसायनी :** पाताळगंगा नदीवरील गेले तीन ते चार वर्ष झाली तरी जुना पूलपाडून दुरूस्ती करा किंवा नवीन बांधा, अशी मागणी नागरिक व औद्योगिक क्षेत्रातून होत आहे. हा पूल आता दुरुस्ती होत नसल्याने एकाच पूलावर सर्व वाहतूक होते आहे व वाहतूक कोंडी व अपघात होत आहेत. याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. एकतर नवीन पूल केला पाहिजे किंवा जुना पूल पाडून नवीन पूल बांधला पाहिजे, पण या बाबतीत काही हालचाल होत नाही व एकाच पूलावर दुहेरी वाहतुकीची भार पडतो व सतत वाहतूक कोंडी व अपघात होतात या बाबतीत ठोस उपाययोजना करण्यात आली पाहिजे, अशी मागणी या भागातील नागरिक करीत आहेत.

### दारूचा साठा हस्तगत

**पनवेल :** तालुक्यातील पुष्पक नोड येथे विनापरवाना देशी दारूचा साथ विक्री केल्याप्रकरणी एका व्यक्तीस पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे. तालुक्यातील पुष्पक नोड सेक्टर आर ४ येथील किराणा दुकानाचे व्यवसाय करणारे हरीशंकर महानंदा पटेल (वय ५७ वर्षे) यांनी त्यांच्या दुकानात विनापरवाना देशी दारूचा साठा करून विक्री केल्याप्रकरणी त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून १७ देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

### प्रणिता काळे-खेरडे यांना पुरस्कार



**पनवेल :** परिवर्तन सामाजिक संस्था व जगदीशब्द फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नवीन पनवेल येथील प्रणिता प्रभाकरराव काळे-खेरडे यांना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने गौरविण्यात आले. महात्मा ज्योजिबा फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त झालेला हा पुरस्कार सोहळा पुणे येथे रविवारी (दि. २७) झाला. यामध्ये रायगड येथील सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार नवीन पनवेलच्या प्रणिता काळे-खेरडे यांना देण्यात आला. याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे.

### ग्रामसभा तहकूब, एक विक्रम

**रसायनी :** आपटा गावाच्या विकासासाठी ठेवलेली ग्रामसभा पुन्हा एकदा तहकूब करून एक विक्रम केला आहे. गावाच्या विकासासाठी ही सभा दुपारी तीन वाजता ठेवली होती, परंतु पुन्हा एकदा ही सभा तहकूब झाली. आपटा ग्रामस्थ हे नेहमीच सभेला उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे निर्णय न होता ही सभा तहकूब होते. या वेळी गावाच्या पुढील काळात ज्या सुधारणा करणे आवश्यक आहे यासाठी ही सभा होती, पण ग्रामस्थ या सभेस न आल्याने गावाच्या विकासाला खिळ बसत आहे. आता बराच तरुणवर्ग सदस्य आहेत, पण गावकीचा पाठिंबा मिळत नाही ही खेदाची बाब आहे. सरपंच, उपसरपंच, सदस्य व ठरावीक ग्रामस्थ व दहापेक्षा कमी ग्रामस्थांची या सभेला उपस्थित होती.

# पनवेलमध्ये प्रधानमंत्री स्वनिधी योजना अंमलबजावणीची सूचना

## कर्ज पुरवठ्यासंदर्भात महापालिकेत बँक प्रतिनिधींसोबत बैठक

**पनवेल : प्रतिनिधी**



प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत महापालिकेच्या वतीने पथविक्रेत्यांना भांडवल सहाय्य म्हणून खेळते भांडवल कर्ज स्वरूपात दहा हजार रुपये उपलब्ध करून देण्यात येत आहे. केंद्र शासनाचा व महाराष्ट्र राज्य शासनाचा हा प्राधान्यक्रमाचा विषय असून संबधित बँकांनी प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत अर्ज केलेल्या लाभार्थ्यांना सहकार्य करून तत्काळ त्यांची कर्जे मंजूर करावे, अशा सूचना आयुक्त गणेश देशमुख यांनी बँक प्रतिनिधींच्या बैठकीत दिल्या.

महापालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (डेएनयुलएम) विभागाच्या वतीने सर्व बँक प्रतिनिधींची बैठक मंगळवारी (दि. २९) मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. या वेळी उपायुक्त कैलास गावडे, दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात, विविध बँकाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपायुक्त कैलास गावडे यांनी बँकांकडे पेडिंग असलेल्या केसेसविषयी माहिती देऊन, बँकांनी महापलिकेला सहकार्य करण्याविषयी सूचित केले. ज्या पथविक्रत्यांचे बँकेत खाते नाही त्यांना झिरो बॅलन्सवरती खाते उघडण्यास मदत करावी. संबधित लाभार्थ्यांना सतत बँकेमध्ये हेलपाटे मारण्यास लागू नये याची काळजी घ्यावी, अशा सूचना त्यांनी उपस्थितांना दिल्या.

नगरपथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. नगरवासीयांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तू व सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. कोविड-१९च्या टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे पथविक्रेत्यांच्या व्यवसायास खेळत्या भांडवलांचा पतपुरवठा तातडीने करण्याच्या उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान स्वनिधी पथविक्रेत्यांसाठी विशेष सुक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने महापालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जात आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विविध स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च माध्यमिक विद्यालयात (वाणिज्य व शास्त्र) शिकणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धा ३ डिसेंबर रोजी (सकाळी १०.००) होणार आहेत तसेच १० डिसेंबर रोजी (सकाळी १०.००) प्रदर्शन घेतले जाणार आहे. या प्रदर्शनामध्ये स्पर्धकांचे मॉडेल्स व पोस्टर्स प्रदर्शित केले जातील. नवी मुंबई झोनमधील सुमारे ६०पेक्षा जास्त उच्च माध्यमिक महाविद्यालयाला या स्पर्धांच्या निमंत्रण पत्रिका पाठवल्या आहेत. या सर्व स्पर्धा घेण्याचा प्रमुख उद्देश उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या वेगवेगळी व्यावसायिक कौशल्ये, लेखन कौशल्ये, संप्रेषण कौशल्ये, व्यासपीठ धाडस यांचा विकास करणे हे आहे.

या प्रत्येक स्पर्धेसाठी सुमारे ३०,००० रुपये रोख रकमेची पारितोषिके देण्यात येणार आहेत तसेच या सर्व स्पर्धांच्या नोंदणीसाठी कोणत्याही प्रकारची शुल्क आकारली जाणार नाही. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका उषा नायर यांनी वेगवेगळ्या महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थी व विद्यार्थिनींना या स्पर्धांसाठी नोंदणी करावी व स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा असे, आवाहन केले आहे.

जास्तीत जास्त उच्च माध्यमिक विद्यालये या स्पर्धांमध्ये सहभाग घेतील अशी आशा व्यक्त केली आहे तसेच प्रा. महेश धायगुडे प्रा. डॉ. फारुक शेख, प्रा. सफिना मुकादम, प्रा. तनुजा सुमन प्रा. कावेरी घोगरे, प्रा. विशाल देशमुख हे सर्व स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत.

# नवीन पनवेल येथे विशेष मतदार नोंदणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**



१८ पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता पिल्लाई कॉलेज ऑफ इंजनिअरिंग नवीन पनवेल येथे विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी रायगड यांचे आदेशाने व उपजल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे उपस्थितीत १८८ पनवेल विधानसभा मदारसंघातील पिल्लाई कॉलेज ऑफ इंजनिअरिंग, नवीन पनवेल येथे १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नमुना नं. ६ चे - १६८ अर्ज व नमुना नं. ८ स्थलांतर / दुरुस्ती करिताचे - १४ अर्ज भरून घेण्यात आले. तसेच मतदार यादीत ऑनलाइन पद्धतीने नाव कसे नोंदवता येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



**खारघर : येथे शुभलक्ष्मी साडी या नामांकित अस्थापनेचे उद्घाटन अभिनेत्री प्राजक्ता माळी हिच्या हस्ते करण्यात आले. या वेळी नारीशक्ती पुरस्कारसुद्धा आयोजित करण्यात आले होते. कामोठ्यातील माजी नगरसेविका डॉ. हेमलता गोवारी यांना प्राजक्ता माळी यांच्या हस्ते नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**



**उलवे नोड : येथे होणारा आठवडा बाजार घाणीचे साम्राज्य पसरवत आहे. याबाबत नियोजन करण्यात यावे अशी मागणी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांनी सिडको इंजिनिअर वाळिंबे आणि देशमुख यांच्याकडे फोनद्वारे केली. दरम्यान, गरज पडली तर हा विषय आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्याकडे मांडून विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित करण्यास सांगावा लागेल, असे म्हात्रे यांनी सांगितले.**




# जसखारमधील रक्तदान शिबिराला प्रतिसाद



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

जसखार गावचे प्रेरणास्थान स्व. गुलाब म्हात्रे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या रक्तदान शिबिरास रायगड जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी सदिच्छा भेट देऊन रक्तदान केले.

सतत ५१ वेळा रक्तदान करण्याचे माझे मानस पूर्ण झाले व स्वर्गीय गुलाब भाई म्हात्रे यांच्या स्मरणार्थ घेतलेले हे रक्तदान शिबिर सर्व युवकांसाठी तसेच आपल्या समाजासाठी प्रेरणादायी ठरेल. कै. गुलाब म्हात्रे यांची स्मृती अशाच सत्कार्यातून समाजापुढे यावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना, असे मनोगत विजय भोईर यांनी शिबिराच्या वेळी व्यक्त केले.

जसखार येथील स्व. गुलाब म्हात्रे यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी स्व. गुलाबभाई मित्र मंडळ जसखार यांच्या वतीने केतन म्हात्रे यांनी जसखार येथील रत्नेश्वरी मंदिरात भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या वेळी विजय भोईर बोलत होते. त्यांनी या सामाजिक कार्याचे कौतुक केले. या रक्तदान शिबिरात एकूण १५० दात्यांनी रक्तदान केले.

शिबिराच्या उदघाटना वेळी सर्वपक्षीय नेत्यांसह स्व. गुलाबभाई मित्र मंडळाचे सदस्य व रक्तदाते उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात अपोलो हॉस्पिटलच्या सहकार्याने शुगर, रक्तदाब तपासणी, शरीरातील कॅल्शिअम तसेच डोळ्यांची तपासणी करण्यात आली. या रक्तदान शिबिराला जनतेचा उत्स्फूर्त, उत्तम प्रतिसाद लाभला. शिबिराचे निवेदन हितेश अशोक म्हात्रे यांनी केले.

# चिरनेर कातळपाडा दत्त मंदिरात हरिनाम सप्ताह

**उरण : वार्ताहर**

दत्त जयंती उत्सवाच्या निमित्ताने उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील दत्त मंदिरात २८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सद्गुरु माऊली हसूराम बाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि गुरुकुलाचे हभप गजानन महाराज, चिदानंद महाराज, मदन महाराज तसेच दात्यांच्या सहकार्याने व्यासपीठचालक गुरुवर्य हभप अनिल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह होणार आहे. यात काकडा, ग्रंथ वाचन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन व श्री सांप्रदाय बैठकीचे आयोजन केले आहे. ४ डिसेंबरला सायंकाळी दीपोत्सवाचा कार्यक्रम, ५ डिसेंबर रोजी हभप अनिल महाराज यांच्या काल्याचा कीर्तनाचा कार्यक्रम होईल.

सप्ताहात हभप प्रभाकर महाराज, र. श पाटील, महादेव महाराज, विलास महाराज, रमेश महाराज, धर्माजी महाराज, शरद महाराज यांचे प्रवचन तर हभप महेश महाराज साळुंखे, नंदकुमार महाराज, हिराजी महाराज शिवकर, सदानंद महाराज, विश्वास महाराज, एकनाथ महाराज, प्रभाकर महाराज यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# ...उलट्या बोंबा

गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रातील अनेक उद्योगधंदे राज्याबाहेर का गेले आणि कोणामुळे गेले याची खरी उत्तरे सर्वांनाच माहीत आहेत. उद्योगांच्या पळवापळवीबाबत महाविकास आघाडीचे नेते सध्या जी कावकाव करत आहेत, त्या पाठीमागचा कावा न ओळखण्याइतकी महाराष्ट्राची जनता दुधखुळी राहिलेली नाही.

**तीन-साडेतीन महिन्यांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० आमदारांनी उठाव केल्यानंतर सत्ताधारी शिवसेनेचे तारू फुटले आणि या पक्षाच्या दुफळ्या झाल्या. या फुटाफुटीतच महाविकास आघाडीची सत्ता संपुष्टात आली. आपल्या सत्ताकाळामध्ये महाविकास आघाडी सरकारने काय उजेड पाडला हे सर्वांना दिसलेच. वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प राज्यासाठी महत्त्वाचा होता यात शंकाच नाही. हा प्रकल्प ऐनवेळेस गुजरातने पळवला आणि याला शिंदे-फडणवीस सरकारच कारणीभूत आहे, असा कांगावा 'शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे' या गटाचे नेते आदित्य ठाकरे करत आहेत, परंतु महाविकास आघाडी सरकारच्या काळात किती नकारात्मक वातावरण होते हे सार्‍यांनी पाहिले आहे. त्याच काळामध्ये सर्वच सत्ताधारी आपापल्या खुर्च्या शाबूत ठेवण्याच्या शर्यतीत मश्गुल राहिल्याने उद्योगधंद्यांना कुणी वालीच उरला नव्हता ही खरी वस्तुस्थिती आहे. आदित्य ठाकरे यांच्या आरोपांचे तीन-तेरा करणारा एक महत्त्वाचा निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने आता घेतला आहे. मागील तीन वर्षांत राज्यातील उद्योग कोणामुळे बाहेर गेले याची चौकशी एका निवृत्त न्यायमूर्तींच्या समितीमार्फत करण्यात येणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले आहे. इतकेच नव्हे तर राज्यातील उद्योग-प्रकल्पांबाबत श्वेतपत्रिका काढण्यात येणार असल्याचेही सामंत यांनी स्पष्ट केले आहे. या समितीच्या अहवालात जी काही उत्तरे मिळतील, ती खरे तर सर्वांना माहीतच आहेत, पण समितीचा अहवाल आला की त्याच्या सत्यतेचे पुरावे स्पष्टपणे बाहेर येतील आणि वस्तुस्थिती कळल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांना बाहेर हिंडण्याची सोय राहणार नाही असे दिसते. महाविकास आघाडीच्या काळात सामंजस्य करार झाल्याची टिवटिव आदित्य ठाकरे करताना दिसतात, परंतु सामंजस्य करार म्हणजे संबंधित उद्योग राज्यात आला असे होत नाही. आदित्य ठाकरे यांना हे माहीत नाही असे नाही, परंतु चिखलफेकीच्या राजकारणात खोटेनाटे आरोप रेटून करावेत असा एक पायंडाच सध्या पडू लागला आहे. महाविकास आघाडी सरकारने केलेले सामंजस्य करार किंवा तेव्हा येऊ घातलेले उद्योग शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात अन्यत्र जात असल्याचा दावा महाविकास आघाडीचे नेते करत असतात, परंतु त्यात काही तथ्य नाही. सिनार्मस हा इंडोनेशियन कंपनीचा प्रकल्प महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारे जमिनीचे हस्तांतर केल्याचे पत्र मंगळवारी त्या कंपनीला देण्यात आले. हा करार दाओस येथेच झाला होता, तरीही हा प्रकल्प महाराष्ट्रात थांबला आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात उद्योग बाहेर जात असल्याची ओरड किती तथ्यहीन आहे हेच यावरुन सिद्ध होत नाही का? महाविकास आघाडीच्या कार्यकाळात उद्योगधंद्यांना पोषक वातावरण नव्हते. या वस्तुस्थितीवर आदित्य ठाकरे आणि त्यांचे साथीदार नेते काही बोलायला तयार नाहीत. येत्या काळात राज्यामध्ये ५० हजार कोटींचे प्रकल्प येणार असून ३० हजार कोटींचे करारदेखील झाले आहेत. ठाकरे सरकारने नेमके काय केले याचा हिशेब येत्या ६० दिवसांत समितीच्या अहवालातूनच होईलच, परंतु श्वेतपत्रिका बाहेर आल्यानंतर मविआ नेत्यांची तोंडे बंद होणार का हा खरा प्रश्न आहे.**

# मुरूड तालुक्यात भाजप जोमाने सज्ज

**मुरूड : संजय करडे**

मुरूड तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीच्या निवडणूक जाहीर झालेल्या आहेत. मुरूड तालुक्यातील कोर्लई, वेळास्ते, वावडुंगी, तेलवडे, काकळघर या ग्रामपंचायतीच्या निवडणुका २८ नोव्हेंबरपासून ते २ डिसेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सर्व प्रक्रिया तहसीलदार कार्यालयात होणार असून तेथे पाच निवडणूक निर्णय अधिकार्‍यांची नेमणुकासुद्धा करण्यात आलेल्या आहेत.

मागील ग्रामपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पक्ष स्वबळावर निवडणुका लढवून दोन नंबरची मते या पक्षाला प्राप्त झाली होती. या वेळी सर्व पक्ष एकत्र येऊन भारतीय जनता पक्षाच्या विरोधात लढले होते. तरीसुद्धा भारतीय जनता पक्षास मोठे मताधिक्य मिळून मतांची टक्केवारी वाढली होती. त्यामुळे विरोधकांना चपराक बसली होती.

यंदा पाच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत काही ठिकाणी स्वबळावर, तर काही ठिकाणी आघाडी करून भाजप लढणार आहे. काकळघर ग्रामपंचायत निवडणुकीत रंगत आहे. येथे थेट सरपंचपदाचा उमेदवार सुरुवातीपासूनच भाजपने जाहीर केला आहे. कृष्णा किंजले हे भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार आहेत, तर सात सदस्यसुद्धा उभे केले जाणार आहेत. या ग्रामपंचायतीवर शिवसेनेचे वर्चस्व होते, परंतु शिवसेनेत दोन भाग झाल्यामुळे येथील शिवसेनेची ताकद विभागली गेली आहे. या ग्रामपंचायतीमध्ये म्हणावी तशी विकासकामे झाली नसल्याने येथील जनता नाराज असून नवीन पर्याय म्हणून भाजप पक्षाकडे मोठ्या अपेक्षेने पहिले जात आहे. या ठिकाणी जनता मोठा बदल घडवून आणणार असून येथे भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित होणार आहे. कृष्णा किंजले यांना जनतेचा चांगला पाठिंबा मिळत असून बदलाचे वारे येथे वाहत आहेत.




वेळास्ते ग्रामपंचायतीमध्येसुद्धा मोठी चुरस निर्माण झाली आहे. शिवसेनेकडे असणारा काही भाग शेकापकडे गेला त्यामुळे मूळ सेनेची ताकद कमी झाली आहे. तर भारतीय जनता पक्षाने येथे आपली ताकद वाढवली असून सेजल शैलेश काते हे थेट सरपंचपदाचे उमेदवार असून स्थानिक पातळीवर जनसंपर्क असल्याने या ठिकाणीसुद्धा अपेक्षित यश भाजपलाच मिळणार असल्याचे दिसून येत आहे.

कोर्लई व तेलवडे या ठिकाणीसुद्धा भारतीय जनता पक्ष स्वबळावर लढणार असून येथे सुद्धा मोठी चुरस निर्माण होऊन नवीन पर्याय म्हणून येथील जनता भाजपला सर्वाधिक पसंती देणार आहे. मुरूड तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी यांनी आमदार प्रशांत ठाकूर व ॲड. महेश मोहिते यांच्या संपर्कात राहून विविध ग्रामपंचायतींच्या विकास कामांसाठी मोठा निधी प्राप्त करून दिल्यामुळे या ठिकाणी मोठा बदल होणार हे अपेक्षित धरले जात आहे.

याबाबत मुरूड तालुका भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी सांगितले की, मुरूड तालुक्यातील पाचही ग्रामपंचायती स्वबळावर लढवणार आहोत. आघाडीबाबत अद्याप पर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही. परस्थती पाहून पुढील निर्णय घेणार आहोत, परंतु यंदा आम्हाला अपेक्षित यश मिळणार असून भाजपचा झेंडा फडकलेला दिसणार आहे. कार्यकर्ते निवडणुकीसाठी विशेष मेहनत घेत असून त्यांच्या श्रमाचे चीज विजयाने पहावयास मिळणार असल्याची प्रतिक्रिया महेंद्र चौलकर यांनी दिली आहे.

नामनिर्देशनपत्र २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत दाखल करण्यात येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी ५ डिसेंबर रोजी होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ७ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असेल व त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे.

# प्रसिद्ध पार्श्वगायक उदित नारायण

प्रसिद्ध पार्श्वगायक उदित नारायण यांचा आज जन्मदिवस आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी. उदित नारायण यांनी नेपाल येथील राज बिराज मधील पी.बी.स्कुलमधून १० वीपर्यंत शिक्षण घेतले. नंतर काठमांडू येथील रत्न राज्य लक्ष्मी कैम्पस येथून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. १९९० ते २००० पर्यंत नारायण बॉलीवूड चित्रपटाचे मुख्य गायकांमधून एक होते. त्यांनी बॉलीवूड मधील प्रमुख नायकांसाठी ऑनस्क्रीन सिंगिंग पण केले आहे. त्यांनी बॉलीवूड अभिनेता अमिताभ, राजेश खन्ना आणि देव आनंद यासारख्या महान अभिनेत्यांसाठी गायन केले आहे.

१९८०मध्ये प्रसिद्ध संगीत निर्देशक राजेश रोशन यांच्या उन्नीस बीस चित्रपटातील दोन गीते त्यांनी गायिली. त्यांना सुप्रसिद्ध प्लेबॅक गायक मोहम्मद रफी यांच्या सोबत गायनाची संधी मिळाली होती. त्यानंतर त्यांचा बॉलीवूड गायनाचा प्रवास सुरू झाला. त्यानंतर फिल्म बडे दिलवाला मध्ये महान गान कोकिला लता मंगेशकर यांच्या सोबत गायनाची संधी महान संगीत निर्देशक आर.डी.बर्मन यांच्याकडून मिळाली होती.

१९७३मध्ये नारायण यांनी एका नेपाली फिल्म 'सिंदूर'साठी गाणे गायिले. हे एक हास्यगीत हास्यकार गोपाल राज मैनाली आणि वसुंधरा भूशाल यांच्यावर चित्रित केले होते. त्यांची सहगायिका सुषमा श्रेष्ठा होती. ज्या हिंदी चित्रपटात पूर्णिमा या नावाने गातात. त्यांनी नेपाळी चित्रपटांसाठी अभिनयसुद्धा केला. त्यांची नावे, कुसुमे रुमाल आणि पीरती असे होते.

२००४मध्ये त्यांनी आपला पहिला अल्बम उपहार रिलीज केला. त्यांनी यात आपल्या पत्नी दीपा झा



सोबत गाणे गायिले आहेत. त्यांनी भजन संगम, भजन वाटिका, आय लव यु, दिल दिवाना, दोस्ती, लव इज लाइफ, जानम, झुमका दे झुमका, सोना नो घडू लो, धुली गंगा, आणि माँ तारिणी, इत्यादी अल्बम गायिले आहेत. त्यांनी गायिलेले ताल से ताल मिला या गाण्याला देसिमार्टीनी, हिन्दुस्तानी टाइम्स आणि फीवर १०४ कडून आयोजित अभियानात दशकातील सर्वात प्रसिद्ध गाने म्हणून घोषित केले होते.

भारतात व विदेशात त्यांनी अनेक स्टेज शोज केले आहेत. त्यांना भारतातील विविध राज्यांकडून विविध राज्यांकडून विविध अनेक अवार्ड मिळालेले आहेत. त्यांना स्क्रीन विडियोकोन अवार्ड, एम् टी.व्ही. बेस्ट व्हिडीओ अवार्ड आणि प्राइड ऑफ़ इंडिया गोल्ड अवार्ड मिळाले आहेत.

२००९ मध्ये पद्मश्री अवार्ड आणि २०१० मध्ये भारतीय गायिका मधुश्री सोबत एक ब्रिटिश चित्रपटासाठी गाने गायिले आहे. २०१४ मध्ये श्रेया घोषाल यांच्यासोबत महिला दिवस निमित्त विशेष अल्बम मध्ये ना हम जो कह दे गाने गायिले आहेत. ज्यांना रामशंकर यांनी संगीतबद्ध केले आहे. नारायण यानी टी.व्ही. शो यह दुनिया गजब की साठी गायक कुमार सानु यांच्या सोबत गाने गायिले आहे.

नारायण सोनी टी.व्ही.वरील इंडियन आयडल मध्ये जज बनले होते. अन्नू मलिक, अलीशा चिनाय यांच्या सोबत त्यांनी जज म्हणून काम केले आहे. यानंतर सोनी टी.व्ही. वरील एक आणखी रियलिटी शो वॉर परिवार मध्ये ही त्यांनी जज म्हणुन काम केले आहे.

आकाशवाणी नेपाल मधून त्यांनी आपले करियर सुरु केल्यावर त्यांनी प्रसिद्धीच्या शिखरावर पोहचेपर्यंत ते बॉलीवूडचे प्रसिद्ध पार्श्वगायक म्हणून आजही श्रोत्यांना आपल्या गाण्यांनी मंत्रमुग्ध करतात. त्यांच्यात एक उत्तम पार्श्वगायकातील सर्व गुण पाहायला मिळतात. नारायण आपल्या मंत्रमुग्ध गीतांसाठी ओळखले जाते. त्यांचा आवाज त्यांची ओळख झाला आहे. त्यांच्या सर्वोत्कृष्ट गीतांमध्ये पापा कहते है मेहँदी लगाके रखना परदेशी परदेशी जाना नहीं आणि ताल से ताल मिलाचा समावेश आहे.

**(साभार : माझी मराठी)**



## बदलते तंत्रज्ञान



# फ्लाइटमध्ये इंटरनेटशिवाय पाहता येणार ओटीटी कंटेंट

एअर एशिया इंडियाने हायपरलोकल क्लाउड प्लॅटफॉर्म शुगरबॉक्ससह नवीन भागीदारी करण्याची घोषणा केली आहे. या भागीदारी अंतर्गत, प्रवाशांना आता AirAsia फ्लाइट्सवर मोफत ओटीटी कंटेंट पाहण्याची संधी मिळणार आहे. एअर एशिया आणि शुगरबॉक्स यांनी संयुक्तपणे एअरफ्लिक्स सेवा सुरू केली आहे. या सेवेंतर्गत युजर्सना ६००० तासांपेक्षा जास्त एचडी कंटेंट, १०००हून अधिक हॉलीवूड आणि बॉलीवूड फिल्म आणि वेब कंटेंट पाहण्याची संधी मिळणार आहे.

एअरफ्लिक्स सेवेसह युजर्सना इन-फ्लाइट कनेक्टिव्हिटी शिवाय म्हणजेच इंटरनेटशिवाय कंटेंटचा अनुभव घेता येईल. एअर एशिया आणि शुगरबॉक्सची ही सेवा पेटंट क्लाउडवर आधारित आहे. विशेष बाब म्हणजे युजर्सना कंटेंट पाहताना फ्लाइटमध्ये बफरिंग सारखी कोणतीही समस्या येणार नाही. युजर्सना 1Gbps पर्यंत स्पीड आणि 8TB स्टोरेज मिळेल. युजर्स फ्लाइटमध्येच बातम्या वाचण्यासोबत गेमिंगचा अनुभव घेऊ शकतील. तसेच, युजर्स ऑनलाइन शॉपिंगदेखील करू शकणार आहेत.

एअर एशिया इंडियासोबत 'एअरफ्लिक्स'च्या माध्यमातून फ्लाइटचा अनुभव बदलण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. जागतिक स्तरावर हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे, जिथे आम्ही शुगरबॉक्सच्या पेटंट क्लाउड फ्रॅगमेंट टेक्नॉलॉजीचा वापर करून क्लाउडची शक्ती फ्लाइटसाठी आणत आहोत, असे शुगरबॉक्सचे सह-संस्थापक रोहित परांजपे यांनी सांगितले.

याचबरोबर, रोहित परांजपे यांनी या सेवेबद्दल आणखी स्पष्ट केले की 'एअरफ्लिक्स' उद्योगात पहिल्यांदाच अनेक सेवा प्रदान करेल – जसे की ओटीटी ॲप्स, ई-कॉमर्स, बातम्या, पॉडकास्ट आणि इन-फ्लाइट एफ अँड बी ऑर्डरिंगसाठी ॲक्सेस. ही सुविधा हायपरलोकल अनुभवांद्वारे ग्राहकांना अमर्याद संधी उपलब्ध करून देण्याची ही केवळ सुरुवात आहे. एअरफ्लिक्सच्या शक्यतांबद्दल खूप उत्सुक आहे आणि पाहुणे प्रवासी त्याचा वापर करतातहे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे.

# जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त...



**निमित्त**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असतांना आजपावतो अनेक रोग अथवा विषाणूजन्य आजाराचा जगाला तसेच भारत सरकारला सामना करावा लागला. सुरुवातीला उपचार पद्धती माहिती व जनजागृती नसल्याने अनेकांना आपला जीव भितीने गमवावा लागला. यामध्ये आपल्या मागील पिढीतील अनेक जण असु शकतात. यामध्ये प्लेगची साथ, कृष्ठरोग, क्षयरोग, मलेरिया इ. आजार आपल्याला माहिती आहे.

राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून आजही या आजारांच्या रुग्णांना मोफत चाचणी व उपचार केला जात आहे. या व्यतिरिक्त मागील दोन ते तीन वर्षांपासून जगात तसेच देशात आपण कोविड केरोना या आजाराचा आपल्याला सामना करावा लागला. याला आजची पिढी सुध्दा साक्षीदार ठरली. आजाराविषयी कोणत्याही प्रकारची माहिती नसल्याने मनात एक प्रकारची भितीने सर्वजग धास्तावले होते. जगात सर्वत्र व्यवहार, कामधंदा ठप्प झाला होता. पण देशाने तसेच शास्त्रज्ञांनी अहोरात्र मेहनत घेऊन या आजारावर लस व उपचार शोघण्यात यश मिळविले.

कोरोना या विषाणूवर लस शोधण्यात यश आले पण एचआयव्ही एड्स या आजारावर लस शोधण्यासाठी अहोरात्र मेहनत करून सुध्दा यश आलेले नाही, याबाबतीत जे या आजाराने ग्रासलेले आहेत अश्या रुग्णांना समुळ उपचाराची आवश्यकता आहे. अशा रुग्णांसाठी समाजाने सामाजिक बांधिलकी ठेवून आदराची भावना व्यक्त करणे अपेक्षित असते.

शासनस्तरावर एचआयव्ही चाचणीसाठी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, धर्मदाय रुग्णालय इ. आदी ठिकाणी एचआयव्ही समुपदेशन व चाचणी मोफत केली जाते.

आयसीटीसी-०१,आयसीटीसी- यामध्ये ऐच्छिक एचआयव्ही चाचणी केली जाते. आयसीटीसी-०१- गरोदर माता यांची एचआयव्ही चाचणी केली जाते, गुप्तरोग व प्रतिबंध उपचार-लैगिक समस्या असल्यास एचआयव्ही चाचणी, रक्तकेंद्र,-रक्तदान शिबिरात संकलन झालेले रक्ताची एचआयव्ही चाचणी केली जाते.

मोबाईल आयसीटीसी- मालगाडी(ट्रक ड्रायव्हर) वाहक,क्लिनर, कारागृहातील आरोपी,बार बाला, हॉटेल कामगार, घरेलू कामगार तसेच गावातून स्थलांतरित लोक,तसेच एनजीओ यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत समुपदेशन व चाचणी केली जाते. जर या चाचणीत कुणी पॉझिटिव्ह आढळल्यास त्यास पुढील उपचारासाठी अँन्टिरिट्रोव्हायरल थेरपी पध्दतीने (ए.आर.टी.) उपचार केले जाते. अॅन्टी रिट्रो व्हायरल थेरपी म्हणजे एच.आय.व्ही विषाणूचे प्रमाण कमी करण्यास मदत होणे. पण आजाराचे समूळ उच्चाटन होत नाही. एखादया व्यक्तीस एच. आय. व्ही.ची बाधा झाल्यास जवळच्या मान्यता प्राप्त ए.आर.टी केंद्रात जाऊन डॉक्टांच्या सल्ल्यानूसार उपचार सुरु करण्यात येते. या सर्व सुविधा (शासनस्तरावर) मोफत आहे.

१९८६ नंतर भारतात शरीरविक्रय करणाऱ्या महिलांचा रोग म्हणून एड्सची लोकांना ओळख झाली. जेव्हा एड्स या आजाराची ओळख झाली तेव्हा जगात कितीतरी लोकांना एचआयव्ही/ एड्स ची लागण झाली होती आणि कितीतरी लोक आजाराला त्यावेळी बळी पडले होते. ह्यूमन इम्युनोडीफीशियन्सी व्हायरस (एचआयव्ही) अर्थात मानवाच्या प्रतिकारशक्तीला नष्ट करणारा विषाणू म्हणजे एचआयव्ही. एड्स हे अक्वायर्ड इम्युनो डीफीशियन्सी सिंड्रोमचे लघुनाम. एखादा विशिष्ट रोग दर्शविणा-या तक्रारी किंवा चिन्हे. रोगांचा प्रतिकार करण्यासाठी आपल्या शरीरात असलेल्या यंत्रणेला नाकाम करुन एचआयव्ही आपल्या शरीरावर हल्ला करतो. कालांतराने, ही प्रतिकार यंत्रणा कमकुवत होते आणि रोगांचा सामना करण्याची नैसर्गिक क्षमता शरीर हरवून बसते. अशावेळेला त्या संक्रमित व्यक्तीला विविध रोग होतात.

जेव्हा चेन्नई (मद्रास) मध्ये १९८६ साली वेश्यावस्तीत भारतातल्या पहिल्या एड्सच्या रुग्णाचं निदान झालं.पाठोपाठ अनेक मोठ्या शहरातून, जिथे जिथे एचआयव्ही/एड्सच्या तपासण्यांची सुविधा होती अशा ठिकाणी रुग्ण सापडू लागले आणि एड्स नावाचा भस्मासुराची देशात बातमी सर्वदूर पसरली. एकीकडे असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्त संक्रमण, मातेकडून गर्भाला किंवा स्तनपान करणाऱ्या बाळाला संक्रमण, शिरेतून नशा आणणाऱ्या औषधांचा वापर, सतत ताप, वजनात घट, जुलाब इ. या सर्व गोष्टींतून एचआयव्ही विषाणूंचा प्रसार आणि एड्सची लागण वाढतच चाललेली होती.

एच आय व्ही/ एड्स या आजारावर कोणतीही प्रतिबंधात्मक लस अथवा प्रभावी औषध नाही त्यामुळे प्रतिबंध हाच एकमेव मुख्य उपचार ठरतो.यासाठी निरोधचा वापर करावा असे शासनातर्फे जनजागृतीपर नेहमीच सांगितले जाते. अधिक माहितीसाठी हेल्पलाईन नं.१०९७ सुरू करण्यात आली आहे. मनुष्य हा कुटूंबाचा प्रमुख कणा आहे. एच.आय.व्ही/एड्स या आजाराची लागण झाल्यावर कुटूंबात होणारा मानसिक व सामाजिक ताण यामुळे कुटूंबाची मानसिक स्थिती खालवली जाते. यासाठी समुपदेशन महत्वाचे ठरले.

लग्न करतांना पत्रिका पाहण्याबरोबर एचआयव्ही चाचणी जर करून घेतली तर युवा पिढी पुढील आयुष्य चांगले जगू शकतील. हे आजच्या पिठीने समजुन घेतले पाहिजे. यासाठी महाविद्यालयात रेडरिबन क्लब स्थापन करून एचआयव्ही एड्स विषयी युवा वर्गात समुपदेशन करून जनजागृती केली जाते. आजपावतो या आजारामुळे कितीतरी लोकांना तसेच देशाला ही आर्थिक हानी पोहचली आहे. ज्यांना लागण झाली आहे त्यांना आपले पुढील जीवन चांगल्याप्रकारे कसे जगता येईल यासाठी केंद्र सरकार, नँको, महाराष्ट्र राज्य, अंतर्गत, म.रा.ए.नि.सो. यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम विविध उपक्रमांनी राबविण्यात येतो. यामध्ये प्रभातफेरी, निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, रक्ताची चाचणी, पदनाट्य, बँनर होल्डिंग, इलेक्ट्रॉनिक मिडिया, वृत्तपत्र इ. मार्फत जनजागृतीपर उपक्रम राबविले जातात.

एचआयव्ही जनजागृतीपर समाजाने सामाजिक बांधिलकी ठेऊन आपली एकता, आपली समानता, एचआयव्ही सह जगणाऱ्याकरिता आपण कलंक आणि भेदभाव, न करता पुढील आयुष्य चांगल्या प्रकारे कसे जगता येईल यासाठी समाजाने तसेच युवा पिढीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन १ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्ताने आपण समाजासाठी करू शकतो.

**लेखन : हेमकांत सोनर, जिल्हा रुग्णालय रक्तकेंद्र, अलिबाग-रायगड.**
**संपादन : मनोज शिवाजी सानप जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग**

## आरोग्य प्रहर



# हिवाळ्यात हिटरचा वापर ठरू शकतो हानिकारक

थंडीचा ऋतू येताच उबदार वाटावं म्हणून आणि थंडीत आजारी पडू नये म्हणून अनेक उपाय करतात. सध्या रूम हिटर्सचा ट्रेंड चांगलाच वाढला आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी लोक अनेकदा हीटरचा वापर करतात. पण तुम्हाला माहीत आहे का, की थंडी टाळण्यासाठी वापरण्यात येणारा हा हीटर आरोग्यासाठी घातक ठरू शकतो ? तुम्हीसुद्धा हिवाळ्यात रूम हीटरचा वापर करत असाल तर हे नक्की वाचा. हिटर वापरण्याच काही तोटे आहेत, ते जाणून घ्या.

**श्वासासंबंधी आजार होऊ शकतात –** हिटर केवळ हवेतील आर्द्रता कमी करत नाही, तर तो वापरत असताना अनेक हानिकारक गॅसही सोडले जातात, ज्यामुळे आपल्या आरोग्याचे नुकसान होऊन हानी पोहोचू शकते. अशावेळी हिटरच्या वापरामुळे श्वसनाचे अनेक आजार होऊ शकतात. याशिवाय अस्थमाच्या रुग्णांसाठीही हिटरचा वापर घातक ठरतो.

**डोळ्यांचे होते नुकसान –** आपल्या शरीरामध्ये अनेक संवेदनशील अवयव असतात. त्यातील एक अवयव म्हणजे डोळे. ते आपल्या शरीराचा एक महत्त्वाचा भाग तर आहेतच, पण त्यांची विशेष काळजीही घेणे आवश्यक आहे. मात्र हिवाळ्यात हिटरचा सतत वापर केल्यास डोळ्यांचे नुकसानही होऊ शकते. खरंतर डोळे निरोगी रहावेत यासाठी ते ओले राहणं महत्वाचं आहे, मात्र हिटरमुळे हवेतील आर्द्रता अथवा ओलावा कमी होतो, ज्यामुळे डोळे देखील कोरडे होऊ लागतात. अशावेळी डोळ्यांना संसर्ग होण्याची शक्यताही वाढते.

**त्वचेसाठी धोकादायक हिटर –** हिटरचा जास्त वेळ वापर केल्यामुळे आपल्या आसपासच्या वातावरणातील ओलावा संपतो. हवेतील कोरडेपणामुळे त्वचेवर खूप वाईट परिणाम होतो. कोरड्या वातावरणामुळे त्वचेचा ओलावाही नाहीसा होतो आणि आपली त्वचा कोरडी पडू लागते. एवढेच नव्हे तर कोरडेपणामुळे त्वचा फुटण्याचा आणि संसर्ग होण्याचा धोकाही लक्षणीयरित्या वाढतो.

**या लोकांनी टाळावा हिटरचा वापर –** जर तुम्हाला दमा किंवा श्वसनासंदर्भातील कोणताही त्रास असेल तर तुम्ही हीटर वापरणे टाळावे. तुम्ही सामान्य हिटरऐवजी ऑइल हिटर वापरू शकता. यामुळे हवेत ओलावा राहतो. तसेच सायनस किंवा ब्राँकायटिसचा त्रास असेल तर त्या व्यक्तींनीही हिटरचा वापर टाळायला हवा. याशिवाय लहान मुलं आणि वृद्ध व्यक्तींनी हिटरपासून लांब रहावे.

# भोराव-निगडे रस्ता कामाचे भूमिपूजन

## आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते शुभारंभ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील भोराव-सवाद-धारवली फणसेकोंड-निगडे या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन मंगळवारी (दि. २९) बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

पोलादपूर तालुक्यात कोट्यावधी रुपयांची विकासकामे सुरू असून काही प्रगतिपथावर आहेत. या महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात जास्त नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर सुरू असल्याचे आमदार भरत गोगावले यांनी या वेळी सांगितले.



आमदार भरत गोगावले यांनी सवाद-धारवली-निगडे या रस्त्याच्या कामाकरिता शासन दरबारी पाठपुरावा केल्यामुळे सुमारे आठ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, बाळासाहेबांची शिवसेनेचे तालुकाप्रमुख निलेश अहिरे, शौकत तारलेकर, सयाजी मांढरे, निगडे ग्रामपंचायत सरपंच कृष्णा खोत, उमेश कालेकर, माजी सभापती रवींद्र फुलसुंदर, सवाद ग्रामपंचायत सरपंच सुरेखा गुडबाडकर, माटवण ग्रामपंचायत सरपंच शंकर सागवेकर, काळवली ग्रामपंचायत सरपंच शांताराम महाडिक, आकले ग्रामपंचायतीचे झांजे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी,शासकीय अधिकारी व ग्रामस्थ या भूमिपूजन समारंभाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोपोली पटेलनगर रहिवाशांचे कचरा आंदोलन

**खोपोली : प्रतिनिधी**

नगर परिषदेची घंटागाडी कचरा उचलण्यासाठी येत नाही, म्हणून शिळफाटा पटेलनगर येथील महिलांनी बुधवारी (दि. ३०) घरात साचवून ठेवलेला कचरा मुंबई-पुणे महामार्गावर आणून टाकला. अनोख्या पद्धतीने आंदोलन केल्याने सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे.

पटेल नगरमध्ये सफाई कर्मचारी येत नाही. त्याचप्रमाणे गटार साफ करण्यासही कर्मचारी केव्हा तरी येतात. त्यामुळे मच्छर, डासांचा प्रादुर्भाव वाढला असून, आमचे आरोग्य धोक्यात आल्याचे आंदोलनकर्त्या महिलांनी या वेळी सांगितले. घंटागाडी येण्याची वेळ निश्चित नाही. त्यामुळे घरातील कचरा साठवून ठेवावा लागतो. आरोग्य विभागाच्या मनमानी कारभाराविरोधात दिवसेंदिवस खोपोलीच्या अनेक भागात असंतोष खदखदत आहे.




**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक ५७ सन २०२२-२०२३**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु. पो. ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना दिनांक ३०/११/२०२२ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०७/१२/२०२२ रोजी १८.०० वाजे पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक ०७/१२/२०२२ रोजी सायंकाळी १८.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर करण्यांत येतील. व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक ०८/१२/२०२२ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा बयाना रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वीर टोळ आंबेत रा.मा. १०० कि.मी. २/०० मध्ये संरक्षक भिंत बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ९९११५० | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | वीर टोळ आंबेत रा.मा. १०० कि.मी. १/२०० मध्ये संरक्षक भिंत बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ८०३७६४ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | धाटाव पोलीस स्टेशनची किरकोळ दुरुस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (२०५९ इमारत दुरूस्ती) | ७६७५१७ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | बारसगांव शिवथर रस्ता प्रजिमा ७० कि.मी. १४/९०० मध्ये गॅबियन वॉल बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ९८१९३७ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | श्रीवर्धन येथील शासकिय विश्रामगृहाची विशेष दुरूस्ती करणे. (छत, प्लास्टर, रंग काम, पाणी आणि सॅनिटरी व इतर) तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२०५९ इमारत दुरूस्ती) | ७९२६२९ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | पोलादपूर वाई सुरूर रा.मा. १३९, कि.मी. ५/३५० मध्ये पुलावरील एप्रॉल आणि नाला ट्रेलिंगचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ७६२६३९ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | पोलादपूर वाई सुरूर रा.मा. १३९ कि.मी. १४/०० लच १८/०० मधील दगड व खडक काढणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ६६०५३० | ७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौले कुसगांव ता. महाड मोहल्ला येथे बंदिस्त गटार बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था. वि.) | ५२९५२३ | ६००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | रोहा येथील ट्रान्झीट कॉर्टरची दुरूस्ती करणे. (१०४/७) तालुका रोहा, जिल्हा रायगड. (२२१६ इमारत दुरूस्ती) | ५६९५५२ | ६००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथील जलतरण तलावाची स्वच्छता व प्लबिंग करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (डिपॉझीट) | ४७९०७१ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ११ | श्रीवर्धन येथील शासकिय विश्राम गृहाची विशेष दुरूस्ती करणे. (अंतर्गत रस्ता) तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२०५९) | ४०४७७३ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १२ | मौजे नागाव गोळवाडी ता. महाड येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था. वि.) | ३५५५०६ | ४००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १३ | श्रीवर्धन येथील सा. बा. विभाग उपअभियंता कार्यालयाची विशेष दुरूस्ती करणे. (अंतर्गत रस्ता व इतर) तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२०५९) | ३९६३९२ | ४००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १४ | वीर टोळ आंबेत रा.मा. १०० कि.मी. ११/०० मध्ये क्रॅश बॅरिअर बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | २४५६०० | ३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४९०३
दिनांक : २५/११/२०२२
विमाका/कोवि/२०२२-२०२३/१७६

**सही/-**
**(एम. आर. नामदे)**
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड


# गुंडगेत आरोग्य तपासणी शिबिर



**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील गुंडगे विभागातील नगरसेविका वैशाली मोरे व राईट टु लिव्ह संस्थेच्या वतीने अंबरनाथ येथील विजय मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटलच्या सहकार्याने गुंडगे येथील बुद्धविहाराच्या सभागृहात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३५४ रुग्णांची तपासणी करण्यात आली तर २७६ जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन शरद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. नगरसेविका वैशाली मोरे, राईट टु लिव्हचे अध्यक्ष बासिल जैलानी, माजी नगरसेवक दीपक मोरे, अरविंद मोरे, उद्योजक अजय पाल, सुरज यादव, सोमनाथ चव्हाण, डॉ. हसन शेख, आरोग्यमित्र निशा गोडबोले उपस्थित होते. या शिबिरात ३५४ जणांची मधुमेह, ईसीजी, रक्तदाब आदी तपासण्या करण्यात आल्या. तपासणी केलेल्या २७६ जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

माजी नगराध्यक्ष सुनंदा कांगणे, सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी, मनोज गायकवाड, किशोर जाधव, उद्योजक विजय पाल, दिनेश वाघमारे, बॉबी वाघमारे आदींनी शिबिरास भेट दिली. आनंद कोरी, मंगेश गायकवाड, जॅकी भालेराव, शबाब टिवाले, राफत बागवान, शैलेश घोडके, दीपक भोयर, मनीष मोरे, साहिल मोरे, रोहन मोरे, भूषण मोरे, बंटी कांबळे आदींनी हे शिबिर यशस्वी करण्यास मेहनत घेतली.



# प्रा. बामणे समन्वयकपदी

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात २७ वर्षांपासून कार्यरत असणारे कवी प्रा. डॉ. देविदास बामणे यांची नुकतीच मुंबई विद्यापीठ डीएलएलई युनिटतर्फे संचालक डॉ. कुणाल जाधव यांनी रायगड जिल्हा समन्वयक पदावर नियुक्ती केली आहे.


MAHAVITARAN

**SHORT E-TENDER NOTICE**

E-Tenders are invited from reputed & experienced contractors registered with MSEDCL for following works under DDF scheme under Roha Division. The cost of each tender & E.M.D is mentioned in the tender documents on website. The details of the tender are as below.

| Tender No. | Nature of Work | EMD Amount Rs. | Tender Fee |
|---|---|---|---|
| EE/ROHA/TECH/ DDF/2022-23/T-03 | Giving 15 KW connection on 22 KV level to 220KV Traction Sub station Nagothane (Central Railway), Tal- Roha, Dist- Raigad in r/o M/s. Executive Engineer, M.S.E.T.C.L, EHV Project Division, Kalwa under DDF Scheme | 7140 | 1180 |
| EE/ROHA/TECH/ DDF/2022-23/T-04 | giving 15 KW connection on 22 KV level to 100 KV Traction Sub station (TSS) at Mangaon Railway Station, Tal-Mangaon, Dist-Raigad in r/o M/s. Addl. Executive Engineer,M.S.E.T.C.L, EHV Project (Lines) S/dn, Panvel.[Existing Cons. No. 039160002411] | 12448 | 1180 |

**TERMS & CONDITIONS:** Blank Tender Documents can be downloaded from our website **https://etender.mahadiscom.in/eatApp** during from dt-01/12/2022 to 07/12/2022 after payment of tender cost online for tender. Last date of submission is 07/12/2022 upto 14:00 Hrs. Other terms and conditions as per tender documents. Contact No. **7875765898.**

**Executive Engineer, Roha Division.**



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in
वेबसाईट :- https://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/७९२/२०२२-२३ दिनांक :- ३०/११/२०२२

**जाहीर निविदा सूचना क्र. ९२/२०२२-२३**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत विविध ०४ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडन टक्केवारी दराच्या निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ०१/१२/२०२२ ते दि १२/१२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे.व सदर निविदा शक्य झाल्यास दि. १३/१२/२०२२ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतच्या सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(योगेश गोडसे)**
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, मौजे उसर्ली (खुर्द), ता. पनवेल, जि. रायगड येथील **श्री. मोहन नानजी भिमानी पटेल व श्री. भरत कानजी शहा** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**
**मौजे-उसर्ली (खुर्द), तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. मोहन नानजी भिमानी पटेल<br>श्री. भरत कानजी शहा | १५९ | ब | ०-२०-०० (२००० चौ. मी) | २००.०० |

सबब वर नमुद बिनशेती मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी / नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/११/२०२१

**सही/-**
**ॲड. श्री. अमोल शंकर साखरे**
शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. ८६५२२३३७७१/९३२४३७२१६६


# गुलाबी थंडीची अद्याप प्रतीक्षाच!

**अलिबाग :** तळकोकणामध्ये पाऊस पडत असल्याने थंडीच्या महिन्यामध्ये कडक ऊन पडतेय. रायगड जिल्ह्यामध्ये याचा परिणाम जाणवत असून डिसेंबर महिना आला तरी हवेत जास्त प्रमाणात गारवा न आल्याने नागरिक गुलाबी थंडीची प्रतीक्षा करीत आहेत. वातावरणातील हा बदल तसेच ऊनाची दाहकता शमवण्यासाठी रसवंतीगृह, नारळ पाणी, ज्यूस सेंटरवर नागरिकांची गर्दी दिसून येतेय.


सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा/वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | वहाळ १०४५ | १९५ | २१९/१<br>२१९/९ | ०-०८-१<br>०-०२-० | एकूण मंजूर १०० चौ.मी. प्रस्तावित | मौजे उलवे येथे भूखंड क्र. २६, सेक्टर-२३, क्षेत्र १०० चौ.मी. | **कै. गोमीबाई गोमा ठाकूर ऊर्फ गोमी गोमा तांडेल (मयत) यांचे वारस**<br>श्री. बाळाराम गोमा तांडेल | निरंक |
| | | | एकूण | ०-१०-१ | | | | |
| २ | तळोजा १०७३ | तळोजे पाचनंद १२९/२८ | ३०३/५क<br>३०३/५ब | ०-११-२<br>०-०६-१ | १५० चौ.मी. | भुखंड क्र. १५५, सेक्टर-२, क्षेत्र १४९.६९ चौ.मी | **१) कै. दत्तू गोमा तांबडे (मयत) यांचे वारस**<br>१.१) श्री. बुधाजी दत्तु तांबडे<br>१.२) श्री. गुरुनाथ दत्तु तांबडे<br>१.३) श्री. मोरेश्वर दत्तु तांबडे<br>१.४) श्री. सुरेश दत्तु तांबडे<br>१.५) श्री. प्रकाश दत्तु तांबडे<br>१.६) श्री. अंकुश दत्तु तांबडे<br>१.७) श्री. लहु दत्तु तांबडे<br>**२) श्री. दशरथ गोमा तांबडे**<br>**३) कै. जनाबाई बाकु उर्फ बाब्या म्हात्रे (मयत) व श्रीमती. सुमन अन्ना म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>३.१) श्री. राम बाल्या उर्फ बाब्या म्हात्रे<br>३.२) श्रीमती कल्पना रामदास भगत<br>३.३) श्रीमती निर्मला यशवंत भोईर<br>३.४) श्रीमती शशी बाळाराम म्हात्रे<br>**४) श्रीमती बारकुबाई श्रावण जितेकर** | निरंक |
| ३ | गव्हाण ४२ | २९९/ ३३० | २८/१ व इतर | ०-९९-७ | एकूण मंजूर ९०० चौ.मी. पैकी ३०० चौ.मी. प्रस्तावित | मौजे उलवे येथे भूखंड क्र. ३६५, सेक्टर-१९, क्षेत्र ३०० चौ.मी. | **दामोदर धर्मा कोळी (मयत) यांचे वारस**<br>श्रीमती नर्मदाबाई बंधु कोळी<br>श्रीमती गंगाबाई पद्माकर कोळी | स्पे.मु.क्र. १९८/२००६<br>स्पे.मु.क्र. २०६/२००६<br>रे.मू.क्र. २५४/२००७<br>स्पे.मु.क्र. ८५/२०१० |
| | | | एकूण | ०-९९-७ | | | | |
| **नोड - द्रोणागिरी** | | | | | | | | |
| ४ | २४५+ २८० | वाल्टीखार ७३/८६ | २०/६ | ०-०९-० | ४० चौ.मी. | द्रोणागिरी भूखंड क्र. १३०, सेक्टर-५२, क्षेत्र ४० चौ.मी. | **मुळ भूधारक श्री. कृष्णा सुदाम ठाकुर व इतर ५ अल्पभूधारकांपैकी**<br>**१. श्रीमती रमाबाई आंबो पाटील** | निरंक |
| **ता. उरण, जि. रायगड** | | | | | | | | |
| ५ | पागोटे/ ९२६ | ७३ | १/९<br>२/५ | ०-८-८<br>०-२९-० | ३५० चौ.मी. | द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. ४१, भूखंड क्र. ५५, क्षेत्र ३५० चौ.मी. या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे. | भूधारक **अशोक हिरु पाटील (फरार/ गहाळ) व काशिबाई हिरु पाटील (मयत)** यांचे वारस<br>**१) कृष्णा अर्जुन पाटील (मयत)** यांचे वारस<br>१) दत्तात्रेय कृष्णा पाटील,<br>२) परशुराम अर्जुन पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, सबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र/करारनामा करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/३४६/२०२२-२३

# ‘मुख्यमंत्री शिंदेंच्या माध्यमातून नवी मुंबईच्या विकासाला चालना’

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील बरेच नेते आमच्या संपर्कात असून लवकरच मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश केला जाणार आहे. लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या भव्य सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला जाणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून नवी मुंबईच्या विकासाला चालना दिली जाणार आहे, अशी माहिती बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे उपनेते विजय नाहटा यांनी ऐरोली येथील आपल्या भाषणात दिली.



ऐरोली येथील चौगुले स्पोर्ट्स असोसिएशनच्या मैदानात सोमवारी (दि. २८) बाळासाहेबांच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांना पद नियुक्ती पत्र वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांनी सांगितले की, कार्यकर्त्यांनी नुसते पद घेऊन बसायचे नसून जनतेत मिसळून लोकांची कामे करायची आहेत. प्रत्येक पदाधिकारी हा जनतेच्या कामात दिसला पाहिजे. प्रत्येक महिन्याला पदाधिकाऱ्यांची एक सभा बोलावली जाणार असून कामाचा अहवाल घेतला जाणार आहे. पुढील काळात पक्षाच्या कार्यकर्त्याला बळ दिले जाणार असून संघटना नवीन असली तरी कार्यकर्ते जुनेच आहेत त्यांना काम करण्याची पद्धत माहीत आहे. येत्या महापालिकेच्या निवडणुकीत पक्षाचा आदेश आला तर युतीच्या माध्यमातून निवडणूक लढू अन्यथा स्वतंत्र निवडणूक लढण्याचीही आमची तयारी असल्याचे जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांनी आपल्या भाषणात सांगितले.

नियुक्ती पत्र वाटप कार्यक्रमात एकूण सातशेच्या वर कार्यकर्त्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली असून त्यात उपजिल्हा प्रमुखांपासून शाखा प्रमुखांपर्यंत, शहर प्रमुख, उपशहर प्रमुख, महिला प्रमुख, युवा सेना प्रमुख, महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी, उत्तरभारतीय सेना, बंजारा सेने, माजी सैनिक सेना, अशा विविध आघाड्यांच्या प्रमुखांना बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे उपनेते विजय नाहटा, जिल्हा प्रमुख विजय चौगुले, माजी महापौर अशोक गावडे यांच्या हस्ते नियुक्ती पत्रक देण्यात आले.

व्यासपीठावर संपर्क प्रमुख किशोर पाटकर, उपजिल्हा प्रमुख रोहिदास पाटील, रामाशेठ वाघमारे, जगदीश गवते, आकाश मढवी, विलास भोईर, बहादूर बिष्ट, चंद्रकांत आगोंडे, अजित सावंत, दीपक सिंग, गणपत शेलार, सुरेश सपकाळ, कमलेश वर्मा,महिला जिल्हा संघटिक सरोजताई पाटील, शहर संघटिक शीतल कचरे इत्यादी उपस्थित होते.

# आयसीआयसीआय बँक करणार सिडको नवी मुंबई मेट्रोसाठी पतपुरवठा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको आणि आयसीआयसीआय बँक यांच्यात शुक्रवारी (दि. २५) करार करण्यात येऊन या करारानुसार आयसीआयसीआय बँकेकडून सिडको नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ करिता ५०० कोटी रुपयांचा पतपुरवठा करण्यात येणार आहे. आयसीआयसीआय बँकेकडून मंजूर करण्यात आलेल्या पतपुरवठ्यामुळे मेट्रो मार्ग क्र. १ प्रकल्पाकरिताची फायनान्शियल क्लोजर प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

यांद्वारे सिडकोचे उपाध्यक्ष डॉ. संजय मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली मेट्रो प्रकल्पातील एक मोठा टप्पा गाठला गेला आहे. नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ वर ३ डब्यांची मेट्रो धावणार आहे. मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर हा ११.१ किमी लांबीचा व ११ स्थानके असणारा मार्ग आहे. या मार्गावरील व्हायडक्टचे काम पूर्ण झाले असून ११पैकी पाच स्थानके प्रवासी वाहतुकीकरिता सुसज्ज झाली आहेत. या मार्गाकरिता सीएमआरएससह सर्व महत्त्वाच्या परवानग्या प्राप्त झाल्या आहेत. उर्वरित सहा स्थानकांचे काम वेगाने सुरू झाले असून संपूर्ण मार्गावर लवकरच प्रवासी वाहतूक सुरू होणे अपेक्षित आहे.

**आयसीआयसीआय बँकेकडून मंजूर करण्यात आलेल्या पतपुरवठ्यामुळे एकप्रकारे सिडकोच्या प्रकल्पांच्या विश्वासार्हतेवर मोहोर उमटविण्यात आली आहे.**
**–डॉ. संजय मुखर्जी, एमडी, सिडको**

मेट्रो मार्ग क्र. १ करीता ३,४०० कोटी रुपये इतका खर्च अंदाजित असून त्यापैकी २,६०० कोटी रुपयांचा खर्च सिडकोकडून यापूर्वीच करण्यात आला आहे. उर्वरित खर्च हा आयसीआयसीआय बँकेकडून करण्यात येणाऱ्या ५०० कोटी रुपयांच्या पतपुरवठ्याद्वारे आणि सिडकोच्या अंतर्गत संचित निधितून करण्यात येणार आहे. नवी मुंबई अंतर्गत कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याच्या दृष्टीने मेट्रोचे प्रकल्प महत्त्वाचा असून येथील नागरिकांना प्रवासाचा उत्तम पर्याय देण्यासह बांधकाम क्षेत्राला चालना देण्याकरिता हा प्रकल्प मोलाची भूमिका बजावणार आहे.



## निवडक

### पोस्ट ऑफिसमध्ये चोरीचा प्रयत्न

**पनवेल :** कळंबोली पोलीस ठाणे हद्दीतील सेक्टर ३ मधील पोस्ट ऑफिसमध्ये खिडकीची ग्रिल काढून चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला, पण काहीही न चोरता चोरट्यांना काढता पाय घ्यावा लागला. पोस्ट ऑफिसमधील कर्मचारी नेहमीप्रमाणे कामावर आल्यानंतर त्यांना खिडकीची ग्रिल गायब झाल्याचे पाहून धक्का बसला, चोरट्यांनी खिडकीची ग्रिल काढून चोरी करण्याचा प्रयत्न केला. या ऑफिसमध्ये पाच संगणक (कॉम्प्युटर) व तिजोरीत रक्कम होती, पण चोरट्यांना चाहूल लागताच त्यांनी पळ काढला, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

### लोकलमधून पडून तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** खांदेश्वर ते मानसरोवर दरम्यान लोकल गाडीतून पडुन एका अज्ञात तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या तरुणाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. खांदेश्वर ते मानसरोवरदरम्यान लोकल गाडीतून एका अज्ञात तरुणाचा स्टेशन कि.मी. नं. ४४/१०,४४/११ चे जवळ कोणत्यातरी अज्ञात लोकल गाडीतून पडुन जखमी होऊन मृत्यू झाला आहे. तरुणाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत असून तरुणाविषयी काही माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२–२७४६७१२२) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. व्ही. दोडमिसे (९४९४९१२२९४) यांच्याशी संपर्क साधावा.

### पनवेल तक्का येथे एकाची आत्महत्या

**पनवेल :** अज्ञात कारणावरून एका व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शहरातील तक्का परिसरात घडली आहे. शहरातील तक्का परिसरात राहणारे रवींद्रनाथ पाटील (वय ५९) यांनी आपल्या राहत्या घरात अज्ञात कारणावरून सिलिंगला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ट्रकमधून डिझेलची चोरी

**पनवेल :** उभ्या ट्रकमधून अज्ञात चोरट्यांनी डिझेलची चोरी केल्याची घटना पनवेल जवळील चिंचवण गावाच्या हद्दीत घडली आहे. राहुल आंधळे या ट्रकचालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक चिंचवण गावाजवळ मुंबई लेनवर द पेंटाकोस्टल मिशन चर्चच्या समोर उभा ठेवला होता. या वेळी अज्ञात व्यक्तीने हा ट्रकच्या इंधन टाकीचे झाकण उघडून आतील १४० लिटर डिझेल (किंमत जवळपास १३ हजार रुपये) चोरी केले. या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# दिघ्यात माता-बाल रुग्णालय
## आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते भूमिपूजन



**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा विभागातील नागरिकांना वैद्यकीय उपचारासाठी आता अन्य ठिकाणी जाण्याची गरज नाही. माजी नगरसेवक नवीन गवते यांच्या पाठपुराव्यामुळे साठे नगर येथे महापालिकेचे माता बाल रुग्णालय बांधण्यात येणार आहे. या रुग्णालयाचा भूमिपूजन समारंभ आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते झाला. या वेळी दिघा येथील हॉस्पिटल चालविण्यासाठी राज्य शासनाकडून निधी मिळवण्याचे आश्वासन आमदार नाईक यांनी दिले.

या कार्यक्रमास माजी आमदार संदीप नाईक, स्थायी समितीचे माजी सभापती अनंत सुतार, माजी सभापती नवीन गवते, माजी नगरसेविका अपर्णा गवते, माजी सरपंच अनिल गवते वीरेश सिंह आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार नाईक यांनी या वेळी दिघा येथील विकास कामांसाठी ५० लाख रुपयांचा स्थानिक आमदार विकास निधी जाहीर केला. माता बाल रुग्णालयासोबतच दिघा येथे जनतेच्या मागणीनुसार सीबीएससी माध्यमाची शाळा सुरू करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. या ठिकाणी जल कुंभाचे काम सुरू असून त्यामुळे दिघा विभागातील पाणीपुरवठा सुरळीत होईल असा विश्वास व्यक्त केला. महापालिकेची आर्थिक स्थिती कुठेही ठासळु न देता पुढील पन्नास वर्षे देखील नवी मुंबईकरांवर कर वाढीचा बोजा देणार नाही असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करून रस्ता रुंदीकरणामध्ये दिघा येथील ज्या नागरिकांनी आपली राहती घरे आणि आणि दुकानांचा त्याग केला आहे त्यांचे पुनर्वसन तातडीने करून घेऊ, अशी ग्वाही दिली. मलनिःसारण केंद्रासाठी एमआयडीसी ने महापालिकेला दिघा येथे दिलेला भूखंड परत घेतला आहे. हा भूखंडदेखील परत प्राप्त करून देऊ असे आश्वासन आमदार नाईक त्यांनी दिले.

सलग पंचवीस वर्षे माझ्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नवी मुंबईच्या जनतेने नवी मुंबई पालिकेत एक हाती सत्ता दिली हे महाराष्ट्रातलं एकमेव उदाहरण आहे, असेही त्यांनी नमूद केले. मोरबे धरणामुळे नवी मुंबई जलसंपन्न झाली आहे तरी देखील शहराची वाढती लोकसंख्या पाहता टाटा हायड्रो पॉवरचे अतिरिक्त पाणी नवी मुंबईकडे वळवण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती देत आमदार नाईक यांनी यामुळे अतिरिक्त दोन महिने कालावधीसाठी नवी मुंबईकडे दोन हजार एमएलडी पाण्याचा साठा यापैकी एक हजार एमएलडी पाणी नवी मुंबई स्वतः साठी ठेवून उर्वरित १,००० एमएलडी पाणी अन्य शहरांना पुरवू शकते.

स्थानिक नगरसेवक नवीन गवते यांनी प्रास्ताविकामध्ये माजी आमदार संदीप नाईक यांनी आपल्याला संधी देत लोकप्रतिनिधी म्हणून आकार उकार दिला स्थायी समिती सभापती म्हणून काम करण्याची संधी दिली. या समितीच्या माध्यमातून दिघा विभागात अनेक विकास कामे केली. कृतज्ञतापूर्वक उल्लेख नवीन गवते यांनी केला. आमदार गणेश नाईक आणि संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली दीडशे कोटींपेक्षा अधिक निधीची विकास कामे दिघा विभागात सुरू आहेत. रुग्णालय, पटनी रस्ता, जलकुंभ, यूटिडब्ल्यू रस्ते इत्यादी विकास कामांचा त्यांनी उल्लेख केला.

# पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

शहर परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळला असून पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे.

पनवेल शहर परिसरात अंदाजे ५० ते ५५ वर्षीय व्यक्तीचा बेवारस मृतदेह आढळला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२–२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेंडगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा
## सापडलेले पाकिट प्रवाशाला केले परत

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षामध्ये विसरलेला पॉकेट रिक्षाचालकाने परत देऊन प्रामाणिकपणा दाखवला आहे. पनवेल तालुक्यातील नांदगाव येथील जगदीश भोईर या रिक्षाचालकाने रिक्षात सापडलेले पाकीट प्रवाश्याला परत दिले आहे. या पॅकिटमध्ये पाच हजार रुपये, ३० हजार रुपयांचा चेक व शासकीय कागदपत्र होते.

भास्कर मुक्कादम शेख हा प्रवासी खारघर येथून भोईर याच्या रिक्षात बसला होता. खांदा कॉलनी मध्ये तो उतरला. रिक्षावाला मार्केट यार्डपर्यंत आला. या वेळी त्याच्या रिक्षामध्ये दुसरे प्रवासी बसले होते. त्याने रिक्षात पहिले असता त्याला आपल्या रिक्षात पॉकेट आढळून आला. त्याने पोलीस पाटील यांना संपर्क केला मग पोलीस पाटलांनी पोलिसांकडून माहिती काढली. त्यानंतर पॅकिट उघडले असता त्या पॅकिटमध्ये नंबर सापडला. मग त्यांनी त्याच्याशी संपर्क साधून पॉकेट, पैसे, चेक परत केला. रिक्षाचालकाने दाखवलेल्या प्रामाणिकतेबद्दल त्याचे कौतुक केले जात आहे.

# आगरी भाषेतील बोली कथासंग्रहाचे प्रकाशन



**नवी मुंबई : बातमीदार**

लेखक अरविंद पाटील यांच्या आगरी भाषेतील बोली या कथासंग्रहाचे मंगळवारी (दि. २९) कोपरखैरणे येथे आगळ्या वेगळ्या पद्धतीने प्रकाशन झाले. अत्यंत साध्या आणि घरगुती पद्धतीने सर्व प्रकारचा बडेजाव टाळत झालेल्या प्रकाशन सोहळ्याची सर्वत्र चर्चा होत आहे.

लेखक अरविंद पाटील यांच्या बोली या कथासंग्रहाचे काल समाजातील कर्तबगार महिलांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी जयश्री पाटील, संजाली पाटील, राजश्री बुबेरा, रंजिता दुधकर, शर्मिला म्हात्रे, दक्षा पाटील, किमया बुबेरा व लेखक अरविंद पाटील हे उपस्थित होते.

बोली हा संपूर्ण आगरी भाषेत लिहिला गेलेला कथासंग्रह आगरी समाजजीवनाचे प्रतिबिंब असल्याचे लेखक अरविंद पाटील यांनी सांगितले. मुळात आगरी समाज हा पुरोगामी विचारांचा समाज असून बदलत्या काळात आणि शहरीकरणामुळे समाजातील चांगल्या प्रथा आणि परंपरा लयास चालल्या आहेत. त्यांचे संवर्धन करणे व विसरत चाललेल्या आगरी भाषेचे साहित्य छापील स्वरूपात संवर्धन व्हावे या हेतूने आपण हे पुस्तक संपूर्ण आगरी भाषेत लिहिले असल्याचे लेखकांनी सांगितले.

पुस्तकाची प्रस्तावना मोहन कोळी यांनी केली आहे तर आकर्षक मुखपृष्ठ प्रसिध्द चित्रकार सुरेश पाटील यांनी साकारले आहे. पुस्तकाचे मूल्य दोनशे रुपये असून हस्र प्रकाशनाने ते प्रकाशित केले आहे.

# कोकण विभागीय वक्तृत्व स्पर्धेत ‘सीकेटी’चा श्रवण कदम तिसरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण महर्षी कै.दादासाहेब लिमये यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. २८) झालेल्या कोकण विभागीय कनिष्ठ महाविद्यालयन वक्तृत्व स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी कला शाखेतील ध्वनी सावंत व श्रवण कदम या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत श्रवण कदम याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.



याबद्दल त्यास रोख पारितोषिक रुपये १००१ रुपये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येऊन गौरविण्यात आले. ही स्पर्धा ग. बा. वडेर हायस्कूल व ओसवाल कनिष्ठ महाविद्यालय पाली, सुधागड. रायगड येथे झाली. या स्पर्धेत संपूर्ण कोकण विभागातून स्पर्धक आले होते.

श्रवण कदम याने प्राप्त केलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मोहोपाड्यात दत्त जयंती उत्सव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थांच्या वतीने सालाबादप्रमाणे ३३ व्यावर्षी श्री गुरुदत्त जन्मोत्सव ग्रामस्थ मंडळ मोहोपाडा यांच्या वतीने बुधवारी (दि. ७ डिसेंबर) श्री गुरुदत्त जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी विविध कार्यक्रम होणार असून सकाळी ६ ते ७ वाजता अभिषेक सोहळा, सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ३ वाजता श्री दत्त प्रासादिक महिला भजन मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम, दुपारी ३ ते ४ किशोर लोहार यांचे तबळा वादक भजन, दुपारी ४ ते ६ वाजता श्री दत्त जन्माचे हभप वामन महाराज भोईर यांचे सुश्राव्य किर्तन, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ तर रात्री श्री दत्त गुरुंची मोहोपाडा ते तलाव पुन्हा फिरून श्री दत्त मंदिर मोहोपाडा अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत ग्रामस्थ श्री दत्त गुरुंच्या जयघोषात तल्लीन होतात.

दरम्यान, मोहोपाडा येथील श्री गुरुदत्त जन्मोत्सव ग्रामस्थ मंडळ गेल्या ३३ वर्षे श्री दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करतात. या वेळी रसायनी व आसपासच्या परिसरातील भाविक भक्तांची दर्शनाला लांबलचक रांग लागल्याचे चित्र पहावयास मिळते. मोहोपाडा येथील श्री दत्तगुरू मनातील इच्छा पूर्ण करतो, असे भाविकांचे म्हणणे आहे. यावर्षीही उत्सवाची जय्यत तयारी मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येणार आहे.




**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी ‘दैनिक राम प्रहर’च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.

येत्या रविवारी, ४ डिसेंबर २०२२ रोजी वाचूया येथील डॉ. नितीन आरेकर (कर्जत) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# खंडाळा घाटात ट्रक शंभर फूट खोल दरीत कोसळला

## एकाचा जागीच मृत्यू, एक गंभीर जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत बुधवारी (दि. ३०) पहाटे चार वाजण्याच्या सुमारास चार अवजड वाहनांत अपघात झाला. या अपघातातील एक ट्रक शंभर फूट खोल दरीत कोसळला. त्यात एका चालकाचा मृत्यू झाला असून, अन्य एक चालक गंभीर जखमी आहे.

चालक अजित जाधव (वय २५, रा. इरली, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) त्याच्या ताब्यातील ट्रेलर (एमएच-४६,बीएम-९३९७) मध्ये कांदा भरून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरुन मुंबईकडे येत होता. बुधवारी पहाटेच्या सुमारास बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत टायर फुटल्याने चालक जाधव याचे ट्रेलरवरील नियंत्रण सुटले आणि ट्रेलरने प्रथम समोर चालेल्या टेम्पो (एमएच-१३,डीक्यू-३१०१) ला आणि



त्यानंतर बाजूने जात असलेला ट्रक (केए-३९,ए-०३४४) ला ठोकर दिली. त्यामुळे विरुद्ध दिशेला वळला आणि उलटला. त्याच ट्रेलरने पुढे जाणाऱ्या दुसऱ्या एका ट्रक (केए-५१,एजी-५९७८) ला पाठीमागून जोरात धडक दिल्याने रस्त्याच्या कडेला असलेली लोखंडी रेलिंग तोडून ट्रक हा सुमारे १०० फूट खोल दरीत कोसळला. तसेच त्याच्या मागोमाग टेलर (एमएच ४६, बीएम ९३९७)ची केबिन तुटून तीही खोल दरीत पडली. या अपघातात ट्रेलर चालक अजित जाधव याला गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्याने तो घटनास्थळी मृत झाला. ट्रक (केए-५१,एजी-५९७८) वरील चालक मंगळू हा ट्रकच्या केबिनमध्ये अडकला होता. देवदूत टीम, आयआरबी पेट्रोलिंग, खोपोली पोलीस, बोरघाट वाहतूक पोलीस, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजीक संस्थेचे सदस्य तसेच लोकमान्य आरोग्य सेवा, डेल्टा फोर्स आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी खूप प्रयत्नांती या जखमी ट्रक चालकाला बाहेर काढले. त्याला कामोठ एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करणयत आले आहे. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला केल्यानंतर दीड तासांनी मुंबईलेनवरील वाहतूक सुरळीत झाली.

या अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## म्हसळ्यातील लेप गावात गतिमंद मुलीवर बलात्कार

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील लेप गावातील २६ वर्षाच्या गतिमंद मुलीवर गावांतील दोन वृध्दांनी बलात्कार केल्याची घटना घडली. त्याबाबत पीडित मुलीच्या नातलग महिलेने फिर्याद दाखल केल्याने म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला आहे.




दोनही वृध्द आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. वृध्दांना भाकऱ्या देण्यासाठी ही पीडित मुलगी त्यांच्या घरी जात असे. तिच्या गतीमंदपणाचा गैरफायदा या वृध्दांनी घेऊन दुष्कृत्य केल्याचे सांगण्यात आले. या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक संदीपान सोनावने करीत आहेत.

## रोह्याच्या सिद्धी सर्णेकरचे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सुयश

**धाटाव : प्रतिनिधी**

वक्तृत्व वाद मंडळातर्फे पुण्याच्या पत्रकार भवनात रविवारी (दि. २७) राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कोएसोच्या रोहा येथील अ‍ॅड. नंदा देशमुख ज्युनियर कॉलेजची विद्यार्थीनी सिध्दी विनायक सर्णेकर (वय १६) हिने उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त केले आहे. या आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांतील अनेक स्पर्धकांनी सहभाग




नोंदविला होता. सिध्दी सर्णेकर हिने 'बरे झाले देवा, निघाले दिवाळे' या विषयावर प्रभावी भाषण केले होते. सिध्दीने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल सर्वच स्तरातून तिचे कौतुक केले आहे.

## कोणी शिक्षक देता का शिक्षक?

### चंदरगाव ग्रामस्थांचे गटशिक्षणाधिकाऱ्यांना साकडे

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील डोंगराळ भागात असलेल्या चंदरगाव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षकांची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. आपल्या पाल्यांना शिक्षक मिळावे, या मागणीसाठी येथील ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

आजूबाजूच्या गावांतील व आदिवासी वाड्यापाड्यांतील विद्यार्थी चंदरगाव प्राथमिक शाळेत येथे ज्ञानकण गिरविण्यासाठी येतात. त्यांच्या घरची परिस्थिती बिकट आहे. या शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत वर्ग आहेत. शंभरपेक्षा अधिक विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. परंतु या सातही वर्गाला शिकवण्यासाठी फक्त तीन शिक्षक आहेत. उपलब्ध शिक्षकांवर अतिरिक्त वर्ग शिकविण्याचा भार व ताण येत आहे. पुरेसे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण होणार कसे? असा प्रश्न पालकांना पडला आहे.

या वर्षी चंदरगाव शाळा सुरू झाली असूनही पुर्ण विषयांसाठी शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या शाळेत शिकवायला आणखी शिक्षक मिळावेत यासाठी चंदरगाव ग्रामस्थांनी पाली येथील पंचायत समिती कार्यालयात जाऊन गटविकास अधिकाऱ्यांना शिक्षक मिळण्याबाबत निवेदन दिले.

**शाळेला वाढीव शिक्षक मिळावे, असे लेखी निवेदन ग्रामस्थांनी दिले आहे. त्याची तात्काळ दखल घेऊन येथील शाळेवर एक शिक्षक वाढविण्यात आला असून एकूण चार शिक्षक येथे कार्यरत आहेत.**

**-साधुराम बांगारे, गटशिक्षणाधिकारी, सुधागड**

## म्हसळ्यात पोलीस भरतीविषयी मार्गदर्शन, प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : जिमाका**

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या गरुडझेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राबाबत श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी अमित शेडगे यांच्या उपस्थितीत म्हसळ्यातील न्यू इग्लिश स्कूलमध्ये नुकतेच विशेष मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले.

या शिबिरात म्हसळा तालुक्यातील १८० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. या वेळी परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरणे, पुस्तके उपलब्ध करून देणे, प्रशिक्षण वर्ग चालू करणे इत्यादी विषयांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. म्हसळा तहसीलदार समिर घारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सोनावणे, रोह्यातील द्रोणाचार्य करीअर मार्गदर्शन केंद्राचे प्रतिनिधी स्वप्नील सकपाळ यांनी प्रशिक्षणार्थींना पोलीस भरतीविषयी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले.

## एक्स्प्रेस वेवरील अपघात रोखण्यासाठी उचलली पावले

# परिवहन खाते अ‍ॅक्शन मोडवर

### १ डिसेंबरपासून नियमांची कडक अंमलबजावणी, वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पनवेल ते बोरघाट पाहणी दौरा

**खालापूर : प्रतिनिधी**

बोरघाटात अपघातांची मालिका सुरू असून, त्यात जीवित हानी व वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या अपघातांना ब्रेक लावण्यासाठी परिवहन खाते अ‍ॅक्शन मोडवर आले आहे. मुंबई-पुणे महामार्गावर वाहतूकीस शिस्त लागावी तसेच अपघातांची संख्या लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी १ डिसेंबरपासून सहा महिन्यांकरिता विशेष तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी दिले आहेत. दरम्यान, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर प्रादेशिक परिवहन आधिकारी आणि महामार्ग पोलिसांची २४ तास करडी नजर असणार आहे.




राज्याचे परिवहन उपआयुक्त अभय देशपांडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (पनवेल) अनील पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (पेण) शशिकांत तिरसे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (पिंपरी चिंचवड) अतुल आदे, बोरघाट सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले, चंद्रकांत माने, संदीप खोतकर व पथकाने मंगळवारी (दि. २९) मुंबई-पुणे महामार्ग व द्रुतगती मार्गावर पनवेल ते बोरघाट, अमृतांजन ब्रिज, रायगड जिल्हा हद्द असा पाहणी दौरा केला. नियमित अपघात होणारी ठिकाणे, द्रुतगती महामार्गावरील आडोशी बोगदा ते फुडमॉल परिसर तसेच जुन्या महामार्गावरील रसायनी वळण रस्ता, दांडफाटा, बोरघाटातील अंडा पॉइंट, अशा नऊ ठिकाणी दीर्घकालीन उपाय योजना राबविण्यासाठी अहवाल सादर करण्यात येणार आहे. तर काही ठिकाणी रस्ता दुभाजक, माहिती फलक, रम्बल स्ट्रिक लावले जाणार आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकारी शशिकांत तिरसे व सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी बोरघाटातील अंडा पॉइंट येथे हाईट बॅरीअर, ९० अंशात वळण घेणारा मार्ग व उतार याकडे लक्ष वेधीत आडोशी बोगदा ते सावरोली खालापूर टोल नाका या रस्त्यावर रबल स्ट्रिक लावण्याबाबत या वेळी आग्रही सूचना केली.

दरम्यान, गुरुवार (१ डिसेंबर) पासून तपासणी पथके नेमण्यात येणार आहेत. एका तपासणी पथकात किमान दोन मोटार वाहन निरीक्षक दर्जाचे अधिकारी राहणार असून या पथकाचे नियंत्रक सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी असतील. वेग मर्यादिचे उल्लंघन करून धावणारी वाहने, चुकीच्या मार्गिकतून जाणारी तसेच चुकीच्या पद्धतीने मार्गिका बदलणारी वाहने, बिना सीटबेल्ट जाणारी वाहने, रस्त्याच्या कडेला अवैधरित्या पार्किंग केलेली वाहने यांच्यावर ही तपासणी पथके करडी नजर ठेवणार आहेत. दरम्यान, महामार्गावरील ब्लॅकस्पॉटना वारंवार भेटी देवून त्यांची दुरुस्ती करून घेण्यावर भर देण्याच्या सूचनासुद्धा देण्यात आल्या आहेत. ता तपासणी पथकांच्या प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी रोज सकाळी मागील २४ तासात त्यांच्या पथकांनी केलेल्या कारवाईचा तपशील अद्ययावत करावा लागणार आहे. तसेच दर सोमवारी सकाळी आठवड्याच्या कामगिरीचा अहवाल परिवहन आयुक्तांना सादर करावा लागणार आहे. तपासणी मोहिमेवर देखरेख, नियंत्रण व मार्गदर्शन करण्याचे काम रस्ता सुरक्षा कक्षाचे उपपरिवहन आयुक्त भरत कळसकर यांच्यावर सोपविण्यात आले आहे.

### २०१८पासून झालेल्या अपघातांची आकडेवारी

***द्रुतगती महामार्गावर २०१८ मध्ये एकूण ३५९ अपघात झाले असून त्यापैकी १०० जीवघेण्या अपघातांमध्ये ११४ लोकांचा बळी गेला होता. २०१९ मध्ये झालेल्या एकूण ३५३ अपघातापैकी ७४ जीवघेण्या अपघातांमध्ये ९२ प्रवाशांचा मृत्यू झाला. २०२०मध्ये कोरोनाच्या महामारीमुळे अपघातांमध्ये घट झाली होती. त्या वर्षी एकूण १६९ अपघात झाले होते त्यातील ६२ जीवघेण्या अपघातांमध्ये ६६ लोकांना जीव गमवावा लागला होता. २०२१मध्ये २०० एकूण अपघात झाले त्यापैकी ७१ जीवघेण्या अपघातांमध्ये ८८ मृत्यू झाले होते, तर या वर्षी जानेवारी ते ऑक्टोबर या १० महिन्यात १६८ अपघातांची नोंद झाली असून त्यापैकी ५६ जीवघेण्या अपघातांमध्ये ६८ लोकांचा मृत्यू झाला आहे.***

## रोहा तालुक्यातील भाजीपाला उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यात दिवसेंदिवस भाजीपाला, फळभाजी लागवडीचे क्षेत्र वाढण्यास सुरुवात झाली आहे. चांगले उत्पन्न मिळत असल्याने शेतकरी कुंडलिका नदीकाठी तसेच पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी भाजीपाला, फळभाजी लागवड करीत आहेत. या भाजीपाला व फळभाजीला स्थानिकस्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल.

भाताचे कोठार म्हणून ओळखले जात असलेल्या रोहा तालुक्यातील शेतकरी आपल्या शेतीत वेगवेगळे प्रयोग करीत आहेत. भातशेती सोबत पूर्वी फळबाग विशेषता आंब्याची बाग, काही प्रमाणात काजू बाग यासह अन्य फळबागा असत. परंतु आता भातशेतीला पूरक असे कलिंगड पीक घेतले जाते. तर कडधान्यासह भाजीपाला लागवडही वाढली आहे.



दरवर्षी भाजीपाला लागवडीचे क्षेत्र वाढत आहे. तालुक्यातील सुतारवाडी, म्हसाडी परिसर, चणेरा विभाग यासह सर्वात जास्त भाजीपाला किल्ला परिसरात काढला जातो. नागठणे, खांब भागातही भाजीपाला लागवड केली जाते. पावसाळा संपला मिरची, पडवळ, कारली, शिराळी, काकडे, वांगी, दुधी, तोंडली आदी भाजीपाला व फळभाज्यांची लागवड करण्यास सुरुवात होते. रोहा तालुक्यात खरीप हंगाम संपल्यानंतर शेतकरी कडधान्य व भाजीपाला पीक मोठ्या प्रमाणावर घेत आहेत.

मात्र बाजारपेठ उपलब्ध नसल्याने पुणे, वाशी येथील घाऊक व्यापारी स्थानिक शेतकऱ्यांकडून कमी भावात भाजीपाला घेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. स्थानिकस्तरावर बाजारपेठ उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीत चांगले आर्थिक उत्पन्न मिळेल.

रोहा तालुक्यात सध्या ३३.५५ हेक्टर क्षेत्रावर मिरची, १५.२० हेक्टर क्षेत्रावर पडवळ, ६.५५ हेक्टर क्षेत्रावर घोसाळी, १२.९ हेक्टर क्षेत्रावर वांगी, ४.१ हेक्टर क्षेत्रावर दुधी, १४.९ हेक्टर क्षेत्रावर भेंडी, ६.५ हेक्टर क्षेत्रावर टोमॅटो, ६.५ हेक्टर क्षेत्रावर शिराळी तसेच काकडी, सफेद कांदा, तोंडली आदींची लागवड करण्यात आली आहे.

## तळाघर येथे नेत्र तपासणी शिबिर

**रोहे : प्रतिनिधी**

जनहित सामाजिक संस्था-धाटाव रोहा आणि लायन्स क्लब इंटरनॅशनल फाउंडेशन-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा तालुक्यातील तळाघर हायस्कूलमध्ये रविवारी नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पूजा जेनरिक मेडिकल तर्फे रक्तदाब व मधुमेह तपासणी करण्यात आली. ५७ ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला. त्यापैकी १३ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात येणार आहे.

लायन्स क्लबचे रवींद्र घरत, पराग फुकणे, धाटाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक मोरे, जनहित संस्थेचे अध्यक्ष अनंता म्हसकर, उपाध्यक्ष निलेश शेळके, सचिव दीपक पवार, महेश वाडकर, प्रज्योत गुरव, रोहिदास भोकटे, विजय भुवड, रोशन घरट, प्रियंका पिंपळकर, शाळेचे चेअरमन विठ्ठल मोरे, मुख्याध्यापक शिंदे, किशोर तावडे, डॉ. अनिरुद्ध तेली, अमोद केळकर, शुभम जाधव, राहुल घरत, सुरेश मगर, पूजा गुरव यांच्यासह शिबिरार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# इंग्लंड सलग दुसऱ्यांदा बाद फेरीत

## फुटबॉल विश्वचषक



**अल रायन : वृत्तसंस्था**

मार्कस रॅशफोर्ड (५०, ६८व्या) आणि फिल फोडेन (५१व्या) यांनी केलेल्या गोलमुळे इंग्लंडने फिफा विश्वचषक स्पर्धेतील ब गटातील सामन्यात वेल्सचा ३-० असा पराभव केला. १९६६चा चॅम्पियन इंग्लंडने सलग दुसऱ्यांदा बाद फेरी गाठली आहे. इंग्लंड आणि वेल्सला पूर्वार्धात एकही गोल करता आला नाही. उत्तरार्धात परिस्थिती बदलली. इंग्लंडने दोन मिनिटांत दोन गोल करीत सामन्याचे चित्रच पालटले.

५०व्या मिनिटाला रॅशफोर्डने फ्री किकवर वेल्सच्या बचावपटूंची जाळी भेदत उत्कृष्ट किक मारली, ज्यावर चेंडू स्विंग होऊन थेट गोल पोस्टमध्ये गेला. डायव्हिंग करूनही गोलरक्षक गोल वाचवू शकला नाही. त्यानंतर बॉक्समधील हॅरी केनच्या पासवर फोडेनने दमदार शॉट २-० असा केला. दोन गोलने पिछाडीवर पडलेल्या वेल्सचा बचाव ढासळू लागला. या सामन्यात आपला दुसरा आणि संघाचा तिसरा गोल करताना रॅशफोर्डने पुन्हा एकदा याचा फायदा घेतला.

केल्विन फिलिप्सने दिलेल्या पासवर मँचेस्टर युनायटेडच्या खेळाडूने संधीचे सोने केले. विश्वचषकाच्या अंतिम फेरीतील इंग्लंडचा हा १००वा गोल होता. ५६व्या मिनिटाला डेन जेम्सने वेल्ससाठी गोल करण्याचा प्रयत्न केला. किफर मूरनेही प्रयत्न केला, पण गोल करू शकला नाही. पहिल्या सत्रात वेल्सने कडवी झुंज दिली, पण दुसऱ्या सत्रामध्ये गॅरेथ बेलच्या बदलीनंतर वेल्स कमकुवत झाला, तर इंग्लंडचे खेळाडू अधिक आक्रमक बनले.

### आठ वर्षांनंतर अमेरिकेचीही धडक

**दोहा :** स्टार मिडफिल्डर क्रिस्टियन पुलिसिकने ३८व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे अमेरिकेने ब गटात इराणवर १-० असा विजय मिळवत फिफा विश्वचषकाच्या अंतिम १६मध्ये प्रवेश केला. अमेरिकन संघाने आठ वर्षांनंतर बाद फेरीत प्रवेश केला आहे. यापूर्वी संघाने २०१४मध्ये बाद फेरी गाठली होती.

पूर्वार्धात अमेरिकेच्या खेळाडूंनी अधिक आक्रमक खेळ करीत गोल करण्याच्या अधिक संधी निर्माण केल्या. पुलिसिकने संघाला सुरुवातीची आघाडी मिळवून दिली. डेस्टने बॉक्सच्या आत चेंडू पुलिसिककडे दिला आणि त्याचे रुपांतर गोलमध्ये करण्यात त्याने कोणतीही चूक केली नाही. अमेरिकेने १-० आघाडी शेवटपर्यंत टिकून ठेवली. यूएस संघाने ४५+७ व्या मिनिटाला त्यांची आघाडी दुप्पट केली, परंतु टीम वेहचा गोल स्ट्राइकसह ऑफसाइडसाठी नाकारण्यात आला. त्यानंतर ४६व्या मिनिटाला पुलिसिकने मैदान सोडले आणि त्याच्या जागी ब्रेंडन ॲरोन्सनला खेळविण्यात आले.

# रायगड जिल्हा पुरुष कबड्डी चाचणी स्पर्धेत रोह्यातील संघांची दमदार कामगिरी

**धाटाव : प्रतिनिधी**


रायगड जिल्हा कबड्डी चाचणी स्पर्धेत अलिबाग, पेण, उरण या तालुक्यांतील मातब्बर कबड्डी संघांवर मात करीत रोहा तालुक्यातील जय हनुमान वाशी, नवयुवक सोनारसिद्ध धाटाव आणि जय बजरंग रोहा या तिन्ही संघांनी अंतिम १६मध्ये प्रवेश मिळवला आहे. हे ३० नोव्हेंबर रोजी पुढील सामने खेळणार आहेत.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने निखिल मयेकर मित्र मंडळाच्या वतीने नागाव येथे रायगड जिल्हा पुरुष चाचणी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा सलग पाच दिवस चालणार असून दररोज चार संघ अंतिम १६मध्ये दाखल होणार आहेत. यामध्ये रोह्यातील संघांनी आपली छाप पाडली.



अष्टपैलू खेळाडू महेश जोगडे, विकास जोगडे यांच्या दमदार चढाई व पकडींच्या जोरदार हनुमान वाशी संघाने मातृछाया कुर्डूस या संघावर चौथ्या फेरीमध्ये तब्बल १३ गुणांनी मात केली. नवतरुण सोनारसिद्ध धाटाव संघाने अजय मोरेच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर बिपिन थळेच्या जय हनुमान चरी या संघावर १७ गुणांनी मात केली, तर जय बजरंग रोहा संघाने श्री हनुमान चरी या संघावर पाच गुणांनी विजय संपादन केला. या सामन्यात राकेश गायकवाड हा आकर्षक खेळाडू ठरला. या तिन्ही संघांनी जिल्ह्यातील कबड्डीरसिकांची मने जिंकली आहेत.

# जिल्हास्तरीय शालेय अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू यांच्यामार्गदर्शनाखाली खारघर येथील बालभारती पब्लिक स्कूलमध्ये झाली.

या स्पर्धेवेळी महापालिकेचे क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख नामदेव पिचड उपस्थित होते. स्पर्धेचे चीफ रेफरी पराग अंकोलेकर होते, तर बालभारती पब्लिक स्कूलचे यतीन आंग्रे व महेंद्र तसेच समीर रेवाळे यांचे स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य लाभले.

**गटनिहाय विजेते व उपविजेते**

१४ वर्षाखालील : मुले-डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर, मुली-डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर, सेंट जोसेफ हायस्कूल नवीन पनवेल; १७ वर्षाखालील : मुले-डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, महात्मा स्कूल खांदा कॉलनी, मुली-डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, बालभारती पब्लिक स्कूल खारघर; १९ वर्षाखालील : मुले-डॉ. पिल्ले ग्लोबल स्कूल खांदा कॉलनी, बालभारती पब्लिक स्कूल खारघर; १९ वर्षाखालील : मुली-बालभारती पब्लिक स्कूल खारघर, केएलई कॉलेज कळंबोली.

# मयंतीवरून सासरे रॉजर बिन्नींना नोटीस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे नवे अध्यक्ष रॉजर बिन्नी यांना हितसंबंधांच्या वादासंदर्भात नोटीस मिळाली आहे. तक्रारदार संजीव गुप्ता यांनी बिन्नी यांची सून मयंती लँगर-बिन्नी ही स्टार स्पोर्ट्ससाठी काम करते यावरून ही तक्रार केली आहे. त्यामुळे सध्या मयंती चर्चेत आहे.

भारताने १९८३ साली पहिल्यांदा विश्वचषक जिंकला. या टीममध्ये मध्यमगती गोलंदाज म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणारे रॉजर बिन्नी यांची बीसीसीआयच्या अध्यक्ष म्हणून निवड झाल्यापासूनच सौरव गांगुलीवरून वाद सुरू झाला होता. गांगुलीचा कार्यकाळ संपल्यामुळे पायउतार झाला की त्याची गच्छंती झाली यावरून तर्क-वितर्क लावले जात होते, मात्र आता सुनेमुळे रॉजर बिन्नी अडचणीत आले आहेत.

# विजय हजारे ट्रॉफी : महाराष्ट्र अंतिम फेरीत

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

विजय हजारे चषक स्पर्धेत झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात महाराष्ट्राने आसामचा १२ धावांनी पराभव केला. उत्तर प्रदेशविरुद्धच्या गेल्या सामन्यात द्विशतक ठोकणाऱ्या महाराष्ट्राच्या ऋतुराज गायकवाडने सलग दुसऱ्या सामन्यात धडाकेबाज खेळी करीत शतक केले. त्याने १२६ चेंडूंत १६८ धावांची खेळी केली.

ऋतुराजच्या तडाखेबंद शतकामुळे महाराष्ट्र संघाने आसामसमोर ३५१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात आसामने निर्धारित ५० षटकांमध्ये ८ बाद ३८८ धावांपर्यंत मजल मारली. या सामन्यात कर्णधार ऋतुराज गायकवाड आपली

## ऋतुराजचे सलग दुसरे शतक



धावांची भूख कायम ठेवत महत्त्वपूर्ण उपांत्य सामन्यातही चमकदार कामगिरी केली.

पहिल्या उपांत्य सामन्यात सौराष्ट्रने कर्नाटकचा पाच विकेट्सनी पराभव केला. या सामन्याचा सामनावीर जयदेव उनाडकट ठरला. या सामन्यात कर्नाटकने सौराष्ट्रासमोर विजयासाठी १७२ धावांचे आव्हान ठेवले होते. कर्नाटककडून सलामीवीर समर्थने सर्वाधिक ८८ धावांची खेळी केली. कर्नाटकचा कर्णधार मयांक अग्रवाल १, तर मनिष पांडे भोपळाही न फोडता माघारी परतला. सौराष्ट्रकडून जयदेव उनाटकटने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. कर्नाटकचे १७२ धावांचे आव्हान पार करताना सौराष्ट्रच्या जय गोहीलने सर्वाधिक ६१ धावा केल्या. त्याला समर्थ व्यासने ३३ आणि प्रेरक मंकडने ३५ धावा करून चांगली साथ दिली. आता २ डिसेंबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर महाराष्ट्र आणि सौराष्ट्र यांच्यात अंतिम सामना होईल.

# अविष्कार सातमकरची जिल्हा कबड्डी संघात निवड

**मुरूड : प्रतिनिधी**

परभणी येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य कबड्डी कुमार गट अजिंक्यपद व निवड चाचणी



कबड्डी स्पर्धेसाठी रायगडच्या कुमार गट संघात उंडरगावचा सुपुत्र अविष्कार सदानंद सातमकर याची निवड झाली आहे. ग्रामीण भागात राहून कबड्डी खेळात उल्लेखनीय कामगिरी करून निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.

रायगड जिल्हा असोसिएशनतर्फे कुमार गट कबड्डी निवड चाचणी उरण येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत जय हनुमान उंडरगाव संघ उपउपांत्य फेरीमध्ये पोहचण्यासाठी अविष्कार सातमकर याने उत्कृष्ट चढाया करून खेळाडू बाद केले होते. त्याला सहकारी खेळाडूंचेही उत्तम सहकार्य लाभले. अविष्कारचा खेळ पाहून त्याची कुमार गट रायगड संघामध्ये निवड करण्यात आली आहे. परभणी येथे होणाऱ्या कुमार गट स्पर्धेत हा खेळाडू खेळणार आहे.

# भारत-न्यूझीलंड तिसरा सामनाही पावसामुळे रद्द

**ख्राईस्टचर्च : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा व अखेरचा एकदिवसीय सामनादेखील पावसामुळे वाहून गेला. त्यामुळे न्यूझीलंडने मालिका १-०ने जिंकली आहे.

न्यूझीलंड दौऱ्यातील संपूर्ण सामन्यांवर पावसाचे सावट दिसून आले. दोन्ही संघांपैकी कोण जिंकणार यापेक्षा पाऊस पडणार का यावरच बरीच चर्चा झाली. मालिकेतील तिसरा सामना बुधवारी (दि. ३०) ख्राईस्टचर्च येथे खेळवला जाणार होता, पण सामन्याआधीही पावसाने हजेरी लावल्याने नाणेफेकीला विलंब झाला. त्यापनंतर नाणेफेक जिंकून न्यूझीलंडने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यजमानांच्या

## यजमानांनी मालिका जिंकली



घातक गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाजांनी नांगी टाकली. सर्वबाद २१९ धावा करीत भारताने विजयासाठी केवळ २२० धावांचे लक्ष किवी संघासमोर ठेवले होते. वॉशिंग्टन सुंदरच्या झुंजार अर्धशतकाने भारत सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहचला. त्याने ५१ धावा केल्या.

न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी ढगाळ हवामानाचा फायदा घेत शानदार गोलंदाजी केली. ॲडम मिल्ने आणि डॅरिल मिशेल या दोघांनी प्रत्येकी तीन गडी बाद करत भारतीय फलंदाजीचे कंबरडे मोडले, तर टिम साऊदीने दोन गडी बाद त्यांना साथ दिली. मिचेल सँटनर आणि लॉकी फर्ग्युसन यांना एक गडी बाद करण्यात यश आले.

भारताने ठेवलेल्या २२० धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात शानदार झाली. सलामीवीर फिन ॲलन आणि यष्टीरक्षक डेव्हॉन कॉनवे या दोघांनी भारतीय गोलंदाजीवर हल्ला चढवला. ॲलनने सर्वाधिक ५७ धावांची खेळी केली, तर कॉन्वे ३८ धावांवर नाबाद राहिला. न्यूझीलंडच्या डावाचे १८वे षटक पूर्ण होताच पावसाचे आगमन झाले आणि खेळ थांबला. प्रतिस्पर्धी संघाची ९७ धावसंख्या असताना उमरान मलिकने एक बळी पटकावून किवी संघाला पहिला झटका दिला होता.

# नेदरलँड्स, सेनेगल उपउपांत्यपूर्व फेरीत

**अल रायन, लुसेल : वृत्तसंस्था**

नेदरलँड्स आणि सेनेगल या संघांनी आपापले अखेरचे साखळी सामने जिंकत फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. नेदरलँड्सने तीन सामन्यांत सात गुणांसह अ गटात अग्रस्थान पटकावत बाद फेरीचा टप्पा गाठला. आफ्रिकन चषक विजेत्या सेनेगलने तीन सामन्यांत सहा गुण मिळवत स्पर्धेत आगेकूच केली. या गटातून यजमान कतार आणि इक्वेडोर या संघांचे आव्हान संपुष्टात आले.

चार वर्षांनंतर विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या मुख्य फेरीसाठी पात्र ठरल्यानंतर नेदरलँड्सने बाद फेरी गाठत पुनरागमन साजरे केले. अ गटात झालेल्या अखेरच्या सामन्यात नेदरलँड्सने यजमान कतारचा २-० असा पराभव केला. नेदरलँड्सची बाद फेरीत पोहचण्याची ही अकरावी वेळ ठरली.

प्रमुख खेळाडूंसह खेळणाऱ्या नेदरलँड्सने चेंडूवरील नियंत्रण, अचूक पासच्या जोरावर कतारवर पूर्ण वर्चस्व राखले. सामन्याच्या २६व्या मिनिटाला कोडी गाकपोने नेदरलँड्सचे गोलचे खाते उघडले. त्याचा स्पर्धेतील हा तिसरा गोल ठरला. त्यानंतर उत्तरार्धात फ्रँकी डी योंगने ४९व्या मिनिटाला नेदरलँड्सचा दुसरा गोल केला. हीच आघाडी अखेपर्यंत कायम राखताना नेदरलँड्सने विजयावर शिक्कामोर्तब केले.

# बीसीसीआय निवड समितीच्या प्रमुख पदांसाठी अनेकांचे अर्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील अपयशानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) संपूर्ण निवड समिती बरखास्त केली होती. त्यानंतर मागवलेल्या अर्जांची अंतिम तारीख २८ नोव्हेंबर होती. या पदासाठी अर्ज केलेल्यांची नावे समोर येत आहेत, ज्यात अनेकांचा समावेश आहे.

नयन मोंगिया, मनिंदर सिंग, शिव सुंदर दास आणि अजय रात्रा या नावांनी या पदासाठी अर्ज केले आहेत. आता बीसीसीआय क्रिकेट सल्लागार समिती नियुक्त करेल, जी त्यांची मुलाखत घेईल. नवीन निवड समितीचे पहिले काम २०२३मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या घरच्या मालिकेसाठी संघ निवडणे असेल. दरम्यान, चेतन शर्मा यांच्या नेतृत्वाखालील आउटगोइंग पॅनल कार्यरत राहणार आहे. हे सदस्य आता विजय हजारे करंडक, देशांतर्गत ५० षटकांची स्पर्धा आणि कूचबिहार चषक या स्पर्धांचे काम पाहतील.



दास सध्या पंजाबमध्ये फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम करत आहे. याआधी तिने राष्ट्रीय क्रिकेट अकादमी आणि भारतीय महिला संघासोबत प्रशिक्षक म्हणून काम केले आहे. दास यांची नियुक्ती झाल्यास, त्यांच्या अनेक सहकार्यांच्या अंदाजानुसार ते ओडिशाचा त्यांचा माजी सहकारी देबाशीस मोहंती यांची जागा घेतील.

माजी डावखुरा फिरकीपटू मनिंदर सिंग, सलामीवीर शिव सुंदर दास, ज्यांना भारतासाठी २०हून अधिक कसोटी खेळण्याचा अनुभव आहे त्यांनी भारतीय क्रिकेट मंडळाच्या वरिष्ठ निवडकर्त्यांच्या पदासाठी अर्ज केला आहे. माजी वेगवान गोलंदाज अजित आगरकरने अर्ज केला आहे की नाही हे निश्चित होऊ शकले नाही. आगरकरने अर्ज केल्यास ते निवड समितीचे अध्यक्ष होण्याची खात्री असल्याचे अनेकांचे मत आहे.

मुंबईच्या वरिष्ठ संघ निवड समितीचे विद्यमान अध्यक्ष सलील अंकोला, माजी यष्टीरक्षक समीर दिघे आणि माजी फलंदाज विनोद कांबळी यांनी मुंबईतून अर्ज केले आहेत. नव्या निवड समितीसाठी सोमवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. ५०हून अधिक लोकांनी अर्ज केल्याचे समजते.

उत्तर विभागातून मनिंदर, अतुल वासन, निखिल चोप्रा, अजय रात्रा आणि रितींदर सिंग सोधी यांनी अर्ज केले आहेत. दास, प्रभंजन मलिक, रश्मी रंजन परिदा, शुभमोय दास आणि सौरशीष लाहिरी यांनी पूर्व विभागातून अर्ज केले आहेत. मध्य प्रदेशातून अमय खुरासिया आणि ज्ञानेंद्र पांडे यांनी अर्ज केले आहेत.

# इंग्लंडचे खेळाडू पाकमध्ये आजारी

**कराची : वृत्तसंस्था**

तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखाली इंग्लंडचा क्रिकेट संघ पाकिस्तान दौऱ्यावर गेला आहे. त्यांच्यातील कसोटी मालिकेला गुरुवार (दि. १)पासून सुरूवात होणार असताना बीबीसीच्या अहवालात पाहुण्या इंग्लंड संघातील तब्बल १४ सदस्यांची तब्येत बिघडल्याने त्यांनी सरावातून माघार घेतल्याची माहिती देण्यात आलीये.

बहुप्रतिक्षित पहिल्या कसोटीपूर्वी इंग्लंड संघातील डझनहून अधिक सदस्य व्हायरसमुळे आजारी पडले आहेत. आजारी सदस्यांमध्ये इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सचाही समावेश आहे. यावर डॉक्टर लक्ष ठेवून आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com